www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी
# युवक आधार

संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ५७ बुधवार, ०५ नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत भोरगिरी येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे**

भोरगिरी - २/११/२०२५ रोजी पंचायत समिती खेड, संयुक्त ग्रामपंचायत भोरगिरी व नेत्रदिप नेत्रालय राजगुरुनगर यांचे संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत भोरगिरी येथील कोटेश्वर मंदिर सभामंडप येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते शिबिरात गावातील महिलांची मोफत नेत्र तपासणी करण्यात येऊन अल्प दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले तसेच शिबिरात एकूण ५० ते ५५ रुग्णांनी डोळ्याची मोफत तपासणी करून घेतली तर ५ महिलांचे अल्प दरात ऑपरेशन हडपसर येथे नेत्रदीप नेत्रालय राजगुरुनगर यांचे वतीने करण्यात येणार आहे तसेच रुग्णांचा येण्या



जाण्याची सोय नेत्रालयामार्फत स्वखर्चाने करण्यात येणार आहे असे नेत्रालयाचे वतीने सांगण्यात आले शिबिराचे उद्धाटन प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती व विद्यमान संचालक श्री विठ्ठल वनघरे, सरपंच दत्तात्रय हिले, ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर पावडे भाऊसाहेब, व ग्रामस्थ व महिला मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते.

## विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिकेच्या भूसंपादनाच्या कर्जास शासनहमी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू नागपूर**

विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिकेच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला हुडकोकडून घ्याव्या लागणाऱ्या दोन हजार कोटी रुपयांच्या कर्जास शासनहमी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार विरार ते अलिबाग मार्गासाठीच्या भूसंपादनासाठी हुडकोचे दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात येणार आहे. यामध्ये उभारण्यात येणाऱ्या कर्जास शासनाने हमी दिली आहे. तसेच यापूर्वीच्या हुडकोमार्फत निधी उभारण्यासाठीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्यास ही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे विरार ते अलिबाग मार्गाच्या भूसंपादनाचा प्रश्न सुटून, या मार्गाचे काम लवकरच सुरू होणार आहे. ही बहुउद्देशीय मार्गिका 126.06 कि.मी. लांबीचे असेल. त्यापैकी मौजे नवघर (जि.पालघर) ते मौजे बलावली (ता.पेण) असे 96.410 कि.मी.चे पहिल्या टप्प्यातील काम बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# निवडणुकांचं बिगुल वाजलं !

### नगरपालिकांचा निकाल ३ डिसेंबरला लागणार; राज्य निवडणूक आयोगाची मोठी घोषणा


**दैनिक युवक आधार**
**मुंबई**

राज्य निवडणूक आयोग आयुक्त दिनेश वाघमारेंनी आज (दि. ४ नोव्हेंबर) पत्रकार परिषद घेऊन राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निवडणुकीचा बिगुल अखेर वाजला. राज्यातील नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला मतदान तर ३ डिसेंबरला निकाल जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे आता राज्यात राजकीय हालचालींना वेग येणार असून वातावरण तापू लागणार आहे.

राज्यभरातील स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांबाबत मोठी घडामोड झाली असून न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेऊन नगर परिषद व नगर पंचायत समित्यांच्या निवडणुकांविषयी महत्त्वाची माहिती दिली.राज्यात एकूण २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायत समित्या यांच्या निवडणुका होणार आहेत. याशिवाय राज्यात एकूण १४७ नगर पंचायतींपैकी ४२ नगर पंचायतांच्या निवडणुका या टप्प्यात घेण्यात येणार आहेत. नगर परिषद सदस्यांची संख्या प्रत्येक ठिकाणी २० ते ७५ या दरम्यान आहे. प्रत्येक प्रभागातील एक सदस्यासाठी मतदारांना एकच मतदान करावे लागणार आहे.

**ऑनलाईन नामनिर्देशनाची सुविधा**

या निवडणुकांमध्ये उमेदवारांसाठी आधुनिक सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांना आता ऑनलाईन नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. संबंधित संकेतस्थळावर नामनिर्देशनाची माहिती भरून, ती आयोगाकडे सादर करता येणार आहे. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.



### निवडणूक कार्यक्रम असा -

- १० नोव्हेंबर नाम निर्देशन पत्र दाखल
- अंतिम मुदत १७ नोव्हेंबर
- छाननी १८ नोव्हेंबर
- माघारी २१ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर (अपील)
- २६ ला अंतिम यादी जाहीर
- मतदान - २ डिसेंबर २०२५
- निकाल - ३ डिसेंबर २०२५

### ईव्हीएमद्वारे मतदान

या सर्व नगर परिषद व नगर पंचायत निवडणुका इलेक्ट्रॉनिक मतदान मशीन (EVM) द्वारे घेण्यात येणार आहेत. मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि कार्यक्षम व्हावी, यासाठी निवडणूक आयोगाने आवश्यक त्या सर्व तयारीस सुरुवात केली आहे.

### मतदारसंख्या आणि मतदान केंद्रे

राज्यातील या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३७६ मतदार आहेत. मतदानासाठी १३ हजार ३५५ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर 60 हजार द्या : वंचित बहुजन आघाडी

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - वंचित बहुजन आघाडी भंडारा जिल्हा तर्फे भंडारा जिल्ह्यात गेल्या पाच दिवसात झालेल्या अति मुसळधार अवकाली पावसामुळे शेतकऱ्यांच्या तोंडात घास हिरावला आहे धान्याच्या कटप्पा अक्षर त्या पाण्यात भिजल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्याला प्रति हेक्टर 60 हजार रुपये द्या नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी मध्ये वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव डी जी रंगारी



यांनी मागणी केलेली आहे समोर त्यांनी सांगितले की खरीप पिक अंतिम टप्प्यात असताना दिनांक 24 ते 30, ऑक्टोबरला अचानक मुसळधार पावसाने हजेरी लावली तयार केले काहींनी कापणी केली तर काही शेतकऱ्यांनी धान सुकवण्यासाठी रस्त्यावर कडेला किंवा खुल्या जागेत पसरवले अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे सर्व धान खराब झाले का खाण्या योग्य योग्य राहिले नाही नुकसान मोठ्या प्रमाणे झाली असून शेतकऱ्यांनी ताबडतोब शेताचे पंचनामे करून ताबडतोब आर्थिक कसा देता येईल त्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावे या अशी मागणी वंचित बहुजन आघाडी साकोली तर्फे मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे निवेदन देताना वंचित बहुजन आघाडी जिल्हा महासचिव डी जी रंगारी,

तालुका अध्यक्ष जगदीश रंगारी, तालुका महिला अध्यक्ष शितल नागदेवे , वंचित बहुजन आघाडीचे माजी महिला जिल्हा संघटक विद्या रंगारी, केवळराम ऊके, जितेंद्र मेश्राम, शिवप्रसाद मेश्राम, पूरनचंद वैद्य, मोरेश्वर राऊत , भूवन गोंधळे, सरपंच अश्विना बावनकुळे ,माहेश्वरी राऊत, पुनम राऊत कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते.

## राघवेंद्र नेत्र ( डोळे) हॉस्पिटलचे उद्घाटनामुळे डॉ. टेके यांचे रूपाने सोलापूरकरांना मिळणार आपुलकीचे सेवा"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी(रघुनाथ देवकर)**

सातारा, सांगली जिल्हा बरोबरच अनेक जिल्ह्यांना डॉ रमाकांत टेके व डॉ. सौ विशाखा टेके नेत्र (डोळे) चिकित्सालय ( हॉस्पिटल) सांगली यांच्या माध्यमातून गेली अनेक वर्ष नेत्र रुग्णांना अतिशय चांगल्या पद्धतीने व आपुलकीने सेवा पुरवली जात असून या ठिकाणी सध्या अनेक रुग्णांना नवी दृष्टी देऊन "समाजसेवा ब्रिद आमचे स्वार्थ सुखाची आच नसे, समाजकारणी देह वाहवा, एक मात्र ध्यास असे या विचारसरणीतुन व अनेक शासकीय योजनांच्या माध्यमातून सेवा देण्याचा प्रयत्न झालेला आहे.

अशा या प्रसिद्ध टेके नेत्र चिकित्सालय (हॉस्पिटल) सांगली यांच्यामार्फत सोलापूर शहरांमध्ये हनुमान मंदिरांनजिक विजापूर रोड सोलापूर या ठिकाणी ज्यांनी शासकीय सेवेमध्ये प्रामाणिकपणे नेत्र रुग्णांची सेवा



करून आपुलकी निर्माण करून किंवा निवृत्त झालेले नेत्र चिकित्सक डॉ तुकाराम चव्हाण यांचे शुभहस्ते राघवेंद्र मित्र चिकित्सालय (हॉस्पिटल) चे उद्धाटन झाले असून. यावेळी क्षेत्रातील मान्यवर त्याचप्रमाणे नेत्ररोगतज्ञ डॉ . रमाकांत टेके यांचे समवेत,विविध तज्ञ डॉक्टर व ग्रामस्थ उपस्थित होते. या रुग्णालयामध्ये सेवानिवृत्त नेत्र (डोळे) डॉ. तुकाराम चव्हाण यांच्या शासकीय सेवेतील प्रदीर्घ अनुभवाचाही रुग्णांना मोठा फायदा होणार आहे. त्यांनी शासकीय सेवेत असताना अनेक जिल्ह्यांमध्ये गोरगरीब रुग्णांना शासकीय योजनांच्या माध्यमातून नवीदृष्टी देण्याच्या पवित्र कार्यामध्ये प्रामाणिकपणे रुग्णांना सेवा देऊन रुग्णांच्या मनामध्ये मोठा आत्मविश्वास निर्माण करण्यामध्ये त्यांनी सिंहाचा वाटा घेतलेला आहे.

त्यामुळे प्रसिद्ध नेत्रतज्ञ श्री व सौ .डॉ. टेके व डॉ. तुकाराम चव्हाण यांच्या माध्यमातून भविष्यातही सोलापूरकर व जिल्हावासियांना चांगल्या पद्धतीची सेवा मिळेल अशा प्रकारच्या उपस्थितांच्या बोलक्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या.




## महिलांच्या सबलीकरणासाठी आणखी एक पाऊल

### संकल्प संघटनेच्या कार्यालयाचे मलकापूर येथे उद्घाटन




**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी( रघुनाथ देवकर):**

संकल्प महिला व मजूर बांधकाम कामगार संघटना, मलकापूर यांच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन राजमाता बहुउद्देशीय महिला मजूर सेवाभावी संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. ज्योती जनार्दन बच्चे व सामाजिक कार्यकर्त्या सौ. दया प्रभावळकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या प्रसंगी संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. माधुरी अशोकराव देसाई, श्वेता आरळेकर, प्रज्ञा आरळेकर, मीना केसरकर कमल खानविलकर .गिता केसरकर. सुनिता भोसले यांच्यासह अनेक महिला बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उद्घाटनानंतर उपस्थित मान्यवरांनी संघटनेच्या माध्यमातून बांधकाम क्षेत्रातील महिला कामगारांचे सबलीकरण, त्यांचे हक्क, सुविधा व सामाजिक सुरक्षा यासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले. संस्थापक अध्यक्षा सौ. माधुरी देसाई यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांच्या आवाजाला बळ देण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ही संघटना कार्यरत राहील."



## सीसीआय मार्फत त्वरीत खरेदी सुरू करा, हेक्टरी खरेदी मर्यादा ३० क्विंटल पर्यंत ठेवावी

दैनिक युवक आधार
यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे

राळेगाव:-परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी कापूस पीक घेतले आहे. सध्या बाजारात खाजगी व्यापारी अत्यंत कमी दराने खरेदी करत असल्याने शेतकऱ्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे,सीसीआय मार्फत सरकारी दराने खरेदी अद्याप सुरू न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहे.त्यामुळे सीसीआयची खरेदी तातडीने सुरू करण्यात यावी ही शेतकऱ्याची मागणी आहे.हवामानातील बदलामुळे कापसातील आर्द्रता काही प्रमाणात वाढलेली आहे.त्यामुळे नियमामध्ये थोडी शिथिलता देऊन १६ % पर्यंत आर्द्रता असलेला कापूस स्वीकारण्यात यावा,तसेच पूर्वी प्रतिहेक्टर ३० क्विंटल पर्यंत कापूस खरेदी केली जात होती,परंतु अलीकडे नवीन आदेशानुसार ती मर्यादा १४ क्विंटल प्रति हेक्टर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांचा मोठा तोटा होणार असून त्यांच्या उत्पादनाचा मोठा भाग बाजारात कमी दरात विकावा लागेल त्यामुळे हा निर्णय पुनर्विचार करून पूर्वीप्रमाणे ३० क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत खरेदीची मर्यादा ठेवण्यात यावी.अशी सर्व शेतकऱ्यांची एक मुखी निवेदन आहे.आपण या मागण्यावर तातडीने विचार करून योग्य ती कारवाई करावी. यावेळी दिलीप कन्नाके राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष,गौतम तागडे सरचिटणीस,प्रवीण काकडे,रमेश पेंदाम,सुमित राऊत,हरीश डाखोरे, अमित डाखोरे,महेश जूनघरे,नितीन वाघमारे,शंकर ठाकरे,अनिकेत गवारकर,किशोर उमरतकार,लैकिक आगलावे,भूपेंद्र चांदेकर,अनिल खरपरवार,दिगंबर वडुळकर,आशिष भोयर,जानराव भुडे इत्यादी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## निष्पक्ष पत्रकारितेचा आदर्श 'दैनिक युवक आधार - मनसे नेत्यांकडून गौरव आणि शुभेच्छा

**मनसे पदाधिकाऱ्यांची दैनिक युवक आधार'च्या पत्रकाराला विशेष भेट**



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

**नाशिक :** स्थानिक पत्रकारिता ही समाजातील समस्यांना आवाज देणारे आणि जनतेपर्यंत सत्य पोहोचवणारे प्रभावी माध्यम आहे. अशाच ध्येयाने कार्यरत असलेल्या 'दैनिक युवक आधार' या वृत्तपत्राच्या कार्याचा गौरव करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नाशिक जिल्हा उपाध्यक्ष मनोज ढिकले, मनसे दिंडोरी तालुका अध्यक्ष तसेच पुरोगामी संघर्ष परिषदेचे नाशिक जिल्हा अध्यक्ष नामदेव गावित यांनी दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी कृष्णा गायकवाड यांची भेट घेतली.

या भेटीत पदाधिकाऱ्यांनी दैनिक युवक आधार वृत्तपत्राच्या सातत्यपूर्ण, निष्पक्ष आणि जनतेच्या बाजूने असलेल्या पत्रकारितेचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, "आजच्या काळात स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ पत्रकारिता टिकवणे हे मोठे आव्हान आहे, आणि 'दैनिक युवक आधार' हे वृत्तपत्र त्या जबाबदारीचे उत्कृष्टपणे पालन करत आहे. जिल्हा व तालुका पातळीवर हे वृत्तपत्र वाचकांचे विश्वासू माध्यम बनले आहे."

यानंतर पदाधिकाऱ्यांनी पत्रकार कृष्णा गायकवाड यांना डायरी व पेन भेट देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा देताना मनसे नेते मनोज ढिकले यांनी सांगितले की, "स्थानिक पत्रकारांनी समाजातील समस्या, अन्याय आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यावर प्रकाश टाकत राहणे आवश्यक आहे. समाजहिताच्या कामात पत्रकारांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे."

यावेळी नामदेव गावित यांनीही गायकवाड यांच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की, "पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. त्यांच्या प्रामाणिक आणि निर्भीड वृत्तांकनामुळे प्रशासनालाही लोकांच्या अडचणी कळतात. अशा पत्रकारांना सदैव आमचा पाठिंबा राहील."या प्रसंगी स्थानिक सामाजिक आणि राजकीय विषयांवरही विचारमंथन झाले. पत्रकार आणि जनतेतील संवाद अधिक मजबूत व्हावा यावर एकमत झाले. भेटीचा समारोप सर्व उपस्थितांच्या शुभेच्छांसह उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# "गव्हाण नाही तर 'गव्हाण-जासईच" !

## जासई ग्रामस्थांचा सिडको-रेल्वेला इशारा; अन्यथा आंदोलनाचा निर्धार !

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण-नेरुळ-बेलापूर या मार्गावर गेल्या अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असणारी उरण लोकल अखेर 12 जानेवारी 20 24 मध्ये या मार्गावर धाऊ लागली सुमारे एक वर्षाचा कलावधी पूर्णत्वाकडे जात असताना या मार्गावर उरण,द्रोणागिरी (बोकडवीरा).न्हावा-शेवा (नवघर) ,शेमटी खार(रांजणपाडा),खारकोपर,बामणडों गरीया मार्गावर आत्ता गव्हाण आणि तरघर या दोन नवीन रेल्वे स्थानकांची वाढ होत असून या मार्गावरील गव्हाण रेल्वे स्थानक व तरघर रेल्वेस्थानक उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहेत मात्र गव्हाण रेल्वे स्थानकाच्या उद्घाटनला आत्ता नामांतराची झालर लागल्याने जासईगावाच्या प्रवेशव्दारा समोर असलेल्या गव्हाण रेल्वे स्थानकाला "गव्हाण-जासई" असे नाव देण्याची मागणी जसई ग्रामस्थांनी लाऊन धरली असून "गव्हाण-जासई"नाव न देताच या रेल्वे स्थानकाचे उद्घाटन केल्यास तीव्र आंदोलन उभारू, असा घणाघाती



इशारा जासई ग्रामस्थांनी दिला आहे. गव्हाण प्रमाणेच जासई ग्रामस्थांचीही जमीन या प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आली असताना, स्थानकाच्या फलकावर फक्त "गव्हाण" असे नाव झळकविणे म्हणजे जासई ग्रामस्थांचा अपमान असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली असून संतापाची लाट उसळली आहे.

आत्तापर्यंत रेल्वे प्रशासने जुन्या यादीत समाविष्ट असणाऱ्या बोकडवीरा व नवघर गावाची नावे त्यात्या स्थानकाला न देता बोकडवीरा स्थानकाला(द्रोणागिरी) तर नवघर रेल्वे स्थानकाला (न्हावा-शेवा) असे नामांतर करून रेल्वे प्रशासने दोन्ही गावच्या ग्रामस्थांच्या तोंडला पाने पुसली आहेत तर लोकप्रतीनिधिनी निवडणुकीचा फायदा घेण्यासाठी हा प्रश्न दिल्लीत रेल्वे प्रशासनाच्या दरबारात नेल्याचे सांगत मोठमोठे बॉनर लाऊन बॉनर बाजी करीत प्रकल्पग्रथच्या नमांतरच्या अशाधुळीस मिळविल्या आहेत.

मात्र या सर्वघडामोडी डोळ्या समोर ठेवीत जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत सिडको कार्यालयात जाऊन 2023 जुलैच्या सिडको ठरावानुसार "गव्हाण-जासई" असे नामविस्तार करावे अशी ठाम मागणी केली.मात्र, सिडकोकडून ठराव होऊनही तो अंमलात आणला गेला नाही. दरम्यान, केंद्रीय रेल्वेमंत्र्यांच्या हस्ते गव्हाण आणि तरघर या स्थानकांचे उद्घाटन करण्याची जोरात तयारी सुरु आहे. पण स्थानकाच्या फलकावर फक्त "गव्हाण" असे नाव दिसताच ग्रामस्थांचा संताप उसळला आहे. या संदर्भात जासई ग्रामपंचायतीकडून पुन्हा सिडकोला जाब विचारण्यात आला असून, नामविस्ताराची मागणी न ऐकली तर आंदोलनाचा मार्ग अवलंबू, असा निर्धार जासई ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या वेळी सरपंच संतोष घरत यांच्यासह सदस्य धीरज घरत, आदित्य घरत, विनायक घरत, संतोष कृष्णाजी घरत, अभिषेक घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## लिंगा कोतवाल गावात जिल्हा परिषद शाळा 'शिक्षकविना'! शिक्षण विभागाच्या निष्क्रियतेने पालक वर्गात नाराजी

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**रिसोड:**-तालुक्यातील लिंगा कोतवाल हे गाव गेल्या अनेक वर्षापासून शिक्षणाच्या मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित आहे. गावात जिल्हा परिषद शाळा असूनही आजपर्यंत येथे कायमस्वरूपी शिक्षक नियुक्त करण्यात आलेला नाही. परिणामी शाळेची दारी उघडी असूनही विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर काळा पडदा पडलेला आहे. ऑक्टोंबर महिना संपला तरीही शाळेत एकही शिक्षक नसल्याची परिस्थिती पालक वर्ग व ग्रामस्थांसाठी अत्यंत वेदनादायक ठरत आहे. या शाळेला'एक ते चौथी' वर्गाची मान्यता असून, सध्या शाळा अक्षरशा: शिक्षकविना आहे. गावातील गोरगरिबांच्या मुलांचे शिक्षण पूर्णपणे ठप्प झाले असून, पालक रोज सकाळी शाळेच्या दारात येतात आणि शिक्षक न आल्याने निराश होऊन परत जातात. ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, काही शिक्षक पूर्वी येथे नियुक्त झाले होते, परंतु त्यांनी शाळेकडे दुर्लक्ष करून मनमानी पद्धतीने वर्तन केले. काही शिक्षक तर शेतात काम करण्यासाठी शाळेच्या वेळेस अनुपस्थित राहत होते. परिणामी गावातील शाळा बदनाम झाली आणि पुढे कोणी या ठिकाणी नेमणूक स्वीकारण्यास तयार नाही.शिक्षकांची मागणी घेऊन पालक वर्ग आणि ग्रामस्थ अनेक वेळा रिसोड येथील शिक्षण विभागात चकरा मारत



आहे. मात्र, जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी व गटशिक्षण अधिकारी यांचे अनुपस्थिती ही सर्वात मोठी अडचण ठरत आहे.'अधिकारी कधीच ऑफिसमध्ये सापडत नाही, फोन केला की नेहमीप्रमाणे मी मीटिंगमध्ये आहे, बाहेर आहे, असे उत्तर दिले जाते,'असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावातील सरपंचांनाही याबाबत दोष देण्यात येत आहे. तीन ते चार महिन्यापासून ग्रामीण पंचायतीमार्फत शिक्षक मागणीचे पत्र देण्याची प्रक्रिया प्रलंबित आहे. गावातील सरपंच स्थानिक असूनही शिक्षणाच्या या निगंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचे पालकाचे म्हणणे आहे. लिंगा कोतवाल गावातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान प्रचंड प्रमाणात होत आहे. शिक्षण हक्क कायदा असूनही मुलांना प्राथमिक शिक्षणाचा हक्क नाकारला जात आहे. ही खेदजनक बाब आहे. गावातील पालक वर्गांची मागणी आहे की शिक्षण विभागाने त्वरित लिंगा कोतवाल शाळेत कायमस्वरूपी शिक्षक नेमावा. तसेच ऑफिसला अनुपस्थित राहणाऱ्या गटशिक्षण अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करावी. या सर्व प्रकारांमुळे शिक्षण व्यवस्थेवरील लोकांचा विश्वास असून, गावातील पालक आणि ग्रामस्थांनी या प्रश्नावर लवकरात लवकर उपाययोजना व्हावी, अशी मागणी केली आहे.

## सद्गुरू सदानंद बाबा महाराज यांच्या १०१ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्त उत्सव

**दैनिक युवक आधार**
**उमरी/ रुपेशकुमार श्रीरामवार**

सद्गुरु श्री सदानंद बाबा महाराज उमरी या भागातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्गुरू सदानंद बाबा महाराज यांच्या १०१ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने उमरी शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाडा ,तेलंगणा, आंध्र प्रदेश तसेच नजीकच्या कर्नाटक राज्यातील असंख्य भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सदानंद सद्गुरु बाबा महाराज यांच्या संजीवन सोहळ्यानिमित्त दरवर्षी येथे हजारो भाविकांची उपस्थिती असते. ७,८, व ९ नोव्हेंबर रोजी उमरी शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी संजीवन समाधी मंदिरात काकड आरती, पूजाअर्चा, यानंतर दुपारी चार वाजता कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. ७ नोव्हेंबर रोजी श्री विक्रम महाराज नांदेडकर यांचे कीर्तन होईल. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी माळावरचा गणपती येथे भाविकांची पायी पदयात्रा काढण्यात



येईल. दुपारी श्री माधवराव वडगावे महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल. ९ रोजी सकाळी काकड आरती, महाअभिषेक पूजाअर्चा यानंतर शहरातून सद्गुरु श्री सदानंद बाबा महाराज यांच्या पादुकांची पालखी मिरवणूक निघेल. दुपारनंतर समाधी मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन संस्थानाधिपती अरविंद महाराज यांनी केले आहे.

## जा रे जा रे पावसा, बुडवू नको पैसा, पाऊस आला मोठा, शेतकऱ्यांचा तोटा



**दैनिक युवक आधार**
**शिरूर कासार प्रतिनिधी, रामकिसन कातखडे**

या वर्षी मे महिन्यापासूनच जोरदार पाऊस सुरू झाला. पेरण्या झाल्या पिकेही चांगली आली. परंतु पाऊस अजूनही थांबायला तयार नाही. त्यामुळे चांगली आलेले पिके अतिवृष्टीमुळे वाया गेली आहेत. येरे येरे पावसा तुला देतो पैसा, या ऐवजी 'जा रे जा रे पावसा, बुडवू नको पैसा, पाऊस आला मोठा, शेतकऱ्यांचा तोटा,' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

प्रत्येक वर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्याने सतत दुष्काळाच्या सावटाखाली शिरूर कासार तालुकाऑ असायचा. पेरणीसाठी नेहमी शेतकऱ्यांना पावसाची वाट पाहावी लागत असे. ' येरे येरे पावसा तुला देतो पैसा' असं म्हणत शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसत असत. कधी कधी पाऊस यायचा, पेरण्या व्हायच्या. पिके उगवून आल्यावर पाऊस पुन्हा दडी मारायचा. उगवलेली पिके जळून जायची आणि दुपार पेरणी शेतकऱ्यांना करावी लागत असे.

यावर्षी मात्र मे महिन्यातच पावसाने सर्वत्र जोरदार हजेरी लावली. पेरण्या झाल्या, पिके उगवून आली, बळीराजा सुखावला! परंतु हे सुख क्षणीक ठरले. पावसाच्या सरीवर सरी चालूच राहिल्या. नदी नाले जून महिन्यातच वाहू लागले होते. तालुक्यातील सर्व लहान-मोठे प्रकल्पही तुडुंब भरले होते. अशातच पावसाचा जोर कायम राहिला. कधी नव्हे तो महापूर तालुका वाशीयांनी अनुभवला. कित्येक शेतकऱ्यांची पिके पाण्यामध्ये सडून गेली. दसरा दिवाळीतही पाऊस अधून मधून चालूच होता. काही प्रमाणात वाचलेली पिके शेतकऱ्यांच्या पदरात पडतील असे वाटत होते. परंतु अजूनही पाऊस चालूच असल्याने शेतकऱ्या स्वप्नावर पाणी फिरले आहे.

गेल्या चार-पाच दिवसापासून पावसाच्या सरी बरसतच आहेत. अजूनही आकाशा काळ्या ढगांनी भरलेलेच आहे. नेहमी येरे येरे पावसा तुला देतो पैसा, असं म्हणणाऱ्या शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यावरजा, जा रे जा रे पावसा, बुडवू नको पैसा, पाऊस आला मोठा, शेतकऱ्यांचा तोटा, असे रडगाणे गाण्याची वेळ आली आहे.

## नांदेड मध्ये सुजात आंबेडकर यांचा निर्धार मेळावा संम्पन्न; मेळाव्याला जनतेचा प्रचंड प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :प्रशांत ढवळे.**

**नांदेड:** वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नांदेड येथे 'स्वाभिमानी निर्धार मेळावा' मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यात वंचित बहुजन आघाडीने आगामी काळात सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकून स्वाभिमानाने सत्ता काबीज करण्याचा निर्धार केला. पक्षाच्या ध्येयधोरणांवर विश्वास ठेवत मोठ्या संख्येने



युवकांनी सुजात आंबेडकर यांच्या हस्ते वंचित बहुजन आघाडीमध्ये प्रवेश केला.

मेळाव्यात उपस्थितांना संबोधित करताना युवा नेते सुजात आंबेडकर यांनी महाविकास आघाडी (MVA) आणि महायुती (NDA) या दोन्ही गटांवर जोरदार टीका केली.

त्यांनी आपल्या भाषणात महत्त्वपूर्ण विधान केले, "जनतेला हे समजून घ्यावे लागेल की घरात साप आहे आणि बाहेर लांडगा आहे. सर्वात आधी तुम्हाला घरातील सापापासून सावधान राहावे लागणार आहे. तो साप म्हणजे काँग्रेस आहे, तर लांडगा म्हणजे भाजप, आरएसएस, शिंदे गट (शिवसेना) आणि अजित पवार गट (राष्ट्रवादी) आहेत."

ते पुढे म्हणाले की, "मजलूम, मुस्लिम आणि वंचित समाजाला आतापर्यंत फसवले गेले आहे आणि फसवणारे दुसरे-तिसरे कोणी नसून काँग्रेस पक्ष आहे."

मेळाव्यात पक्षप्रवेश केलेल्या युवकांना सुजात आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले. या पक्षप्रवेश सोहळ्यामुळे नांदेड जिल्ह्यामध्ये वंचित बहुजन आघाडीची ताकद आणखी वाढली आहे.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद, युवा आघाडी राज्य कार्यकारिणी सदस्य अक्षय बनसोडे, जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, इंजि. प्रशांत इंगोले यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना अतिवृष्टी अनुदानाचा लाभ मिळावा - तहसीलदारांना निवेदन!

### विहिरी असणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय मिळणार का ?

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** शहरात व तालुक्यात सन २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.शासनाने जाहीर केलेल्या अतिवृष्टी अनुदान योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांना आज पर्यंत मदत मिळाली नाही व विहिरी असूनही आणि ठिबक संचाद्वारे शेती करणाऱ्या हंगामी बागायतदार शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्यात आले आहे,

> "आमच्या सातबाऱ्यावर विहीर असून ठिबक संचाद्वारे शेती करतो, तरीही कोरडवाहू म्हणून वर्गवारी झाली. शासनाने प्रत्यक्ष शेताच्या परिस्थितीचा विचार करून मदत द्यावी."
>
> — सुभाषराव महालपुरे, शेतकरी,गोंदेगाव

> "आमच्या शेतात विहीर असून पाठस्थळी असून सुद्धा आमच्या सातबारावर जिरांईत नोंद आहे.
>
> गणेश राकडे शेतकरी बनोटी

का अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.या पार्श्वभूमीवर गोदेंगाव व ग्रामपंचायतीच्या मासिक सभेच्या ठराव क्र. ०८, दिनांक ३० सप्टेंबर २०२५ नुसार तहसीलदार सोयगाव यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,सातबारा उताऱ्यावर विहिरींची नोंद असूनही अनेक शेतकऱ्यांना कोरडवाहू शेतकरी म्हणून अनुदान देण्यात येते.त्यामुळे या शेतकऱ्यांना हंगामी बागायत क्षेत्र म्हणून गणून त्यांना शासनाने घोषित केलेल्या अतिवृष्टी अनुदानाचा लाभ मिळावा,अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनात तहसीलदारांना आवाहन करण्यात आले आहे की,मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना तातडीने आवश्यक सूचना देऊन,पात्र शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# सुकळी प. स. गणातून सौ.चंद्रकांता माधवराव यादवकुळे इच्छुक उमेदवार

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**
**राजु गायकवाड**



नुकत्याच झालेल्या मिनी मंत्रालय जिल्हा परिषद गट आरक्षण सोडतीमुळे अनेक इच्छुकांच्या आशा पल्लवी झालेल्या आहेत

त्यातील तालुक्यातील पोफाळी जिल्हा परिषद गटातील सुकळी गण हा ओबीसी महिला या प्रवर्गासाठी सुटल्यामुळे बऱ्याच इच्छुकांची गर्दी उमेदवारीसाठी दिसत आहे काही इच्छुकांची पक्षश्रेष्ठींकडे मोर्चे बांधणी चालू आहे त्यातील महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री आदरणीय इंद्रनील नाईक यांचे खंदे समर्थक व क्रांती पाटील कामारकर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष यांच्या जवळचे असलेले अविनाश पाटील यादवकुळे यांच्या मातोश्री सौ. चंद्रकांता माधवराव पाटील यादवकुळे यांच्या नावाला सुकळी पंचायत समिती गणातून मराठा व आदिवासी समाजातून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे त्यामुळेच या सुकळी गणातून त्यांची उमेदवारी निश्चित असल्याचे चित्र दिसत आहे या परिवाराने धार्मिक सामाजिक कार्यात भरीव कामगिरी केलेली आहे विशेषता स्थानिक पातळीवरील प्रत्येक प्रश्नांना तालुका स्तरावर जिल्हा स्तरावर मांडून विकासात्मक पाठपुरावा करणारे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे (अजित पवार गट) विधानसभा युवक अध्यक्ष अविनाश पाटील व त्यांचे बंधू मंगेश पाटील माजी पोलीस पाटील तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी उमरखेड उपाध्यक्ष जिल्हा परिषद पोफाळी गटातील पक्षाची धुरा आपल्या खांद्यावर पेलत पाठीमागे कोणताही राजकीय वारसा नसताना प्रबळ दावेदारी म्हणून त्यांच्या मातोश्रींचे नाव समोर आलेले आहे स्थानिक पातळीवर नेहमीच त्यांनी 80% समाजकारण आणि 20 टक्के राजकारण करून गावातील गणातील समस्यांचा विचारपूर्वक अभ्यास करून सामाजिक आणि धार्मिक पातळीवर उपक्रम राबवून युवकांचे संघटन मजबूत करून गावाला व्यसनमुक्त करण्यासाठी नेहमीच प्रयत्न केले त्याचबरोबर त्यांच्यासोबत पक्षांतर्गत असलेला दलित समाज मुस्लिम समाज बंजारा समाज ठामपणे आज त्यांच्या बाजूने आहे सौ. चंद्रकांता माधवराव पाटील यादवकुळे यांना पक्षाने उमेदवारी दिल्यास आणि त्यांच्या नावाला जनतेतून पसंती मिळत असल्यामुळे त्यांनाही निवडणूक सहजगत्या जिंकता येईल.

# खेडलेझुंगे येथे गुटखा आणि गावठी दारूचा साठा जप्त!

## लासलगाव पोलिसांची सलग धडक कारवाई; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**खेडलेझुंगे :** लासलगाव पोलिस पथकाने खेडलेझुंगे परिसरात सलग दोन धडक कारवायांमध्ये राज्य शासनाने बंदी घातलेल्या गुटख्याचा तसेच बेकायदा गावठी हातभट्टी दारूचा साठा जप्त केला आहे. दोन्ही प्रकरणांत दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांच्या या सलग मोहिमेमुळे परिसरातील अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

पहिल्या कारवाईत, दि. ३ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास पोलिसांनी खेडलेझुंगे येथील योगीराज हॉटेलवर छापा टाकला असता आरोपी अरुण अशोक गिते (वय ४०) याच्याकडे



राज्य शासनाने बंदी घातलेल्या विविध कंपन्यांच्या सुगंधित पानमसाला, गुटखा आणि जर्दाचा साठा आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून ८,०३० रुपये किंमतीचा डायरेक्टर, गोवा, विमल, शॉट, राजनिवास, जी-१ आणि आर.एन.०१ या ब्रँडचा गुटखा व पानमसाला जप्त केला.

महाराष्ट्र शासनाच्या १८ जुलै २०२३ च्या अधिसूचनेनुसार या उत्पादनांच्या विक्री आणि साठवणीवर बंदी असतानाही आरोपीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मानवी आरोग्यास अपायकारक पदार्थ विक्रीसाठी ठेवले असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे पो.शि. दगू शिंदे यांच्या फिर्यादीवरून त्याच्याविरुद्ध भा.न्या.सं. २०२३ च्या कलम १२३, २२३, २७४ व २७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत, याच

**पो. नि. भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लासलगाव पोलिसांची सलग धडाकेबाज मोहीम; अवैध धंदे करणाऱ्यांत भीतीचं वातावरण**

पथकाने खेडलेझुंगे परिसरात छापा टाकून बेकायदा गावठी हातभट्टी दारूचा साठा जप्त केला. यावेळी आरोपी ज्ञानेश्वर पुंडलीक लोखंडे (वय ३९) हा आपल्या राहत्या घराच्या मागे दारू साठवून ठेवत असल्याचे आढळले. पोलिसांनी १८ लिटर दारू, मुद्देमाल किंमत १,८०० रुपये असा साठा जप्त केला. या प्रकरणी पोलीस शिपाई दगडू श्रवण शिंदे यांनी फिर्याद दिली असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवायांमध्ये पो.हवा. संदीप शिंदे, पो.शि. दगडू शिंदे, सागर आरोटे, अरुण डोंगरे आदींचा सहभाग होता. ही कारवाई स.पो.नि. भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. किसन पवार व पो.हवा. संदीप शिंदे यांच्या पथकाने केली असून पुढील तपास सुरू आहे.

लासलगाव पोलिसांच्या सलग आणि अचूक कारवायांमुळे गावठी दारू व गुटखा विक्रेत्यांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून स्थानिक नागरिकांनी पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक व्यक्त केले आहे.

# महिला टी-२० विश्वचषक दृष्टिबाधित क्रिकेट २०२५ साठी टीम इंडिया जर्सीचे अनावरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय दृष्टिबाधित क्रिकेट संघाने इंडसइंड बँक यांच्या सहयोगातून आगामी महिला टी-२० विश्वचषक दृष्टिबाधित क्रिकेट २०२५ साठी टीम इंडियाच्या अधिकृत जर्सीचे अनावरण केले. हा ऐतिहासिक विश्वचषक ११ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे.




या अनावरण सोहळ्यास सीएबीआयचे अध्यक्ष व समर्थन ट्रस्टचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. महंतेश जी. किवादासन्नवर, सीएबीआयचे अधिकारी, टीमच्या कर्णधार आणि उपकर्णधार, इंडसइंड बँकेच्या कार्यकारी उपाध्यक्ष आणि कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व प्रमुख मटिल्डा लोबो, स्पर्धेच्या अध्यक्षा मीनाक्षी लेखी, भारतातील श्रीलंकेच्या उच्चायुक्त महामहीम महिषिनी कोलोन तसेच टीम इंडियाचे समर्थक उपस्थित होते.

इंडसइंड बँक गेल्या दशकभरापासून दृष्टिबाधित क्रिकेटची अभिमानास्पद भागीदार आहे. बँकेच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांद्वारे (CSR) खेळांच्या माध्यमातून समावेशकता आणि सक्षमीकरणाला चालना देण्याचे कार्य सातत्याने केले जात आहे.जर्सीचे अनावरण हा भारतीय दृष्टिबाधित महिला क्रिकेटसाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. कारण भारतीय महिला संघ आता जगातील पहिल्या दृष्टिबाधित महिला टी-२० विश्वचषकात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा स्पर्धा ११ ते २३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नवी दिल्ली, बेंगळुरू आणि कोलंबो येथे पार पडणार असून ऑस्ट्रेलिया, भारत, नेपाळ, पाकिस्तान, श्रीलंका आणि अमेरिका हे सात देश यात सहभागी होणार आहेत.

# परभणी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका रा स प स्वबळावर लढणार - जिल्हाअध्यक्ष अशोक हाके

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे**

राष्ट्रीय समाज पक्ष परभणी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे राष्ट्रीय समाज पक्षाचे परभणी जिल्हाअध्यक्ष अशोक हाके यांनी पाथरी येथे सांगितले यावेळी हाके म्हणाले की परभणी जिल्हा परिषदेवर व सर्व नगरपालिकेवर एकहाती सत्ता आणायसाठी संपूर्ण तयारी झाली आहे येत्या दोन ते तीन दिवसांत सर्व नगरपालिकेवर नगराध्यक्ष पदाचा उमेदवार व नगरसेवक यांची घोषणा करु असे ठामपणे हाके यांनी



सांगितले यावेळी हाके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाने निवडणूक लढविली होती तर आज या परभणी जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय समाज पक्षाचे पदाधिकारी मोठ्या उत्साहाने जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणूक स्वता हातात घेत आहेत राष्ट्रीय समाज पक्ष सर्वसमावेशक समाजाला उमेदवारी देणार आहे पाथरी मतदारसंघात गंगाखेड मतदारसंघात चांगले पैकी राष्ट्रीय समाज पक्षाला मतदान झाले होते व गंगाखेड मतदारसंघात आज राष्ट्रीय समाज पक्षाचे आमदार आहेत नगरपालिका ही राष्ट्रीय समाज पक्षाच्या ताब्यात होती आणि गेल्या पंचवार्षिक जिल्हा परिषदेत सदस्य ही होते तर काहीचा निसडता पराभव झाला होता तर आज आम्ही सर्व ताकदीनिशी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणूक स्वबळावर लढणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अशोक हाके यांनी सांगितले

# मुक्ता खटावकर यांचा दर्जेदार शिक्षण आंतरराष्ट्रीय परिषदमध्ये सहभाग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता भानुदास खटावकर यांनी श्रीलंकेत आयोजित "इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन क्वालिटी एज्युकेशन २०२५" या आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदे मध्ये स्कूल प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. ही परिषद श्रीलंकेतील उवा प्रांतात दिनांक २८ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान पार पडली.

या परिषदेत शैक्षणिक गुणवत्ता, पाठ्यक्रम विकास, विज्ञान व तंत्रज्ञान, शाळांमधील नेतृत्व विकास, आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे शिक्षण





क्षेत्रातील क्रांती, तसेच विविध शैक्षणिक धोरणांवर सखोल चर्चा झाली. या परिषदेत सुमारे १२० मुख्याध्यापक सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून १९ मुख्याध्यापकांना सहभागाची संधी लाभली, त्यात मुक्ता खटावकर यांनी उल्लेखनीय सहभाग नोंदविला. त्यांनी टेक्नॉलिजिकल पेडागॉजिकल कन्टेन्ट नॉलेज या विषयावर सादरीकरण करून तांत्रिक शैक्षणिक सामग्री ज्ञानाबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या या सादरीकरणाची उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली. परिषदेच्या समारोप प्रसंगी उवा प्रांताचे राज्यपाल जे.एम. कपिला जयसेखरा यांच्या यांच्या मार्फत चीफ सेक्रेटरी ऑफ उवा प्रांत यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. या गौरवाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# शिक्षक गैरहजर, विद्यार्थी वाऱ्यावर; 'गवळथड' शाळेत 'शिक्षणा'चा खेळखंडोबा!

## शिक्षणाधिकारी लक्ष देणार का? गवळथड शाळेत शिक्षक 'कधीही येतात, कधीही जातात'

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि**
**महेश पेन्दोर**

**(घाटंजी):** दिवाळीच्या सुट्ट्या संपून १ नोव्हेंबर २०२५ पासून शाळा पुन्हा सुरू झाल्या असल्या तरी, यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील गवळथड येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. शाळेत अनेक शिक्षक सतत गैरहजर राहत असल्याने आणि उपस्थित शिक्षकही 'कधीही येतात आणि कधीही जातात' असा त्यांचा शिरस्ता असल्याने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळ सुरू असल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे.

**पालकांचा संताप:**

शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत. गावातील लोकांमध्ये या शिक्षकांच्या आद्य काळजीपणा नसण्याबद्दल तीव्र चर्चा आहे.



**वेळेचं बंधन नाही:**

शिक्षक शाळेत येण्या-जाण्यासाठी कोणत्याही वेळेचे बंधन पाळत नाहीत. यामुळे शाळा सुरू होऊनही विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण मिळत नाहीये.

**प्रशासनाचे दुर्लक्ष: '**

मुलांच्या भविष्यावर गदा' येत असतानाही शिक्षण विभाग या गंभीर प्रकाराकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप पालकवर्गाने केला आहे.

**"आम्ही कोणाकडे पाहायचं?"**

गवळथड येथील हवालदील पालकांनी आपली व्यथा बोलून दाखवली. एका पालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, "दिवाळीची सुट्टी संपली, शाळा सुरू झाली. पण आमचे मास्तर (शिक्षक) अजून सुट्टीतच आहेत की काय, हेच कळत नाही. कधी शाळेची घंटा वाजते तर कधी शाळेचे दार बंद असते. आमची मुलं रस्त्यावर भटकतात, पुस्तके घेऊन घरी बसतात. आम्ही कोणाकडे पाहायचं?"

**शिक्षण विभागाला आव्हान**

गवळथड शाळेतील या गंभीर प्रकाराने सरकारी शाळांमधील शिक्षणाच्या गुणवत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शिक्षण विभागाने या बेजबाबदार शिक्षकांवर तात्काळ आणि कठोर कारवाई करावी, अन्यथा पालकांना शाळेवर टाळे ठोकावे लागेल, असा इशारा गावातील नागरिकांनी दिला आहे.

**शिक्षण विभागाने लक्ष द्यावे**

या संदर्भात शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित लक्ष घालून गवळथड शाळेतील गैरहजर शिक्षकांवर निलंबनाची कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# देवगाव गटातून शिवा पाटील सुरासे यांच्या उमेदवारीची शिवसैनिकांकडून जोरदार मागणी!

**शेतकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरलेले आणि 46 गावांच्या विकासासाठी झटणारे नेते — शिवा पाटील सुरासे यांना कार्यकर्त्यांचा सुर उमेदवारी तुम्हीच करावी**



**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**देवगाव:-** जिल्हा परिषद गटात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख आणि निफाड पंचायत समितीचे माजी सभापती शिवा पाटील सुरासे यांच्या जिल्हा परिषद निवडणुकीतील उमेदवारीसाठी शिवसैनिकांनी जोरदार मागणी केली आहे.

देवगाव जिल्हा परिषद गटात देवगाव गण आणि नांदूर मधमेश्वर गण हे दोन गण येतात. या दोन्ही गणांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत सर्व शिवसैनिकांनी एकमुखाने ठराव मांडत "देवगाव गटातून शिवा पाटील सुरासे यांनीच उमेदवारी करावी अशी ठाम मागणी केली आहे

गेल्या आठ वर्षांपासून पंचायत समितीच्या माध्यमातून उपसभापती व सभापती म्हणून काम करताना, त्यांनी ४६ ग्रामपंचायतींमधील विकासकामे, निधी मिळवणे, रस्ते, पाण्याच्या योजना, शाळा आणि शेती विषयक प्रकल्प राबवणे अशा अनेक उपक्रमांमधून नेतृत्व दाखवले आहे.त्यांच्या कार्यकाळात ग्रामपंचायतींना दिशा देणे, शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणे आणि जनतेच्या अडचणी शासन पातळीवर मांडणे हे सातत्याने केले गेले.शिवा पाटील सुरासे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी अनेक वेळा रस्त्यावर उतरून रास्ता रोको आंदोलने, निवेदन मोर्चे आणि तीव्र लढे उभारले आहेत. वीज, पाणी, विमा भरपाई, पीकहानी या मुद्द्यांवर त्यांनी शेतकऱ्यांचा आवाज बुलंद केला. त्यामुळेच ते जनतेच्या हितासाठी नेहमी लढणारे, २४ तास उपलब्ध आणि लोकाभिमुख नेते म्हणून ओळखले जातात.बैठकीत कार्यकर्त्यांनी ठामपणे सांगितले की,"शिवा पाटील सुरासे यांनी गेल्या अनेक वर्षांत देवगाव गटाचा विकास साधला. जनतेचा विश्वास आणि शिवसेनेचा झेंडा दोन्ही त्यांनी कायम उंच ठेवले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने त्यांनाच उमेदवारी करावी ही आमची एकमुखी मागणी आहे."

या बैठकीस जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विलासराव शिंदे, उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर तासकर, तसेच विलास नागरे, बाबासाहेब चितळकर, अरुण श्रींग, बद्रीनाथ लोहारकर, बाळासाहेब साबळे, नवनाथ तासकर, महेश गायकवाड, निवृत्ती खुळे, सतीश पाटील, अरुण कणसे, नितीन जाधव, विनोद गाजरे, योगेश शिंदे, भूषण आरोटे, पप्पू घोटेकर, विलास गवळी यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

बैठकीतून उमटलेल्या एकमुखी मागणीमुळे देवगाव गटातील राजकीय समीकरणांमध्ये नवे वळण येण्याची चिन्हे दिसत असून, शिवसैनिकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे.

# वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत घाटनांद्रा येथे कार्यशाळा संपन्न

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**
**योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील घाटनांद्रा येथील सहकारी सोसायटीत राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक ( नाबार्ड ) यांच्या वित्तीय साक्षरता अभियानांतर्गत सोमवार रोजी खातेदारांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा पार पडली.

कार्यक्रमात उपस्थित शेतकरी व खातेदारांना तालुका कर्ज अधिकारी एस.वाय.डकले यांनी बँकेच्या विविध योजना, ठेवी वाढवणे, व्यापारी व शेतकरी यांनी करंट खाते उघडणे, सी के वाय सी, अशा विविध सुविधा व कार्यपद्धतीची माहिती दिली.

तसेच आधुनिक शेतीसाठी संगणक साक्षरतेचे महत्व, पायाभूत सुविधा उभारणी, अन्नसुरक्षा मजबूत करणे व शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवता येईल यावर मार्गदर्शन केले.

यावेळी अध्यक्षस्थानी सोसायटीचे चेअरमन पुंडलिक पाटील मोरे, गट सचिव बी.डी.कुंभारे, भाग चौकसनिस डी.के.जंजाळ, शाखाधिकारी विष्णू पी पालोदकर ,के.के. पल्हाळ, हर्षद





देशमुख, ए. जी. मोरे, एस के.कदम ,एस. आर. काकडे, माजी जिल्हा परिषद सदस्य कौतिकराव मोरे, व्ही. एस. पवार, एस. एम. भालेकर, अशोक गुळवे, ग्रामपंचायत सदस्य आनंदा मोरे, रघुनाथ मोरे, कचरू मोरे आदींसह पंचकमिटी व सोसायटीचे सभासद यांची उपस्थिती होती

# रिसोड येथे "अंगणी लावा तुळस,प्राणवायूचा होईल कळस" कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**रिसोड - प्रतिनिधी.. रणजितसिह. ठाकूर....**

राम तुळस,कृष्ण तुळस,कर्पूर तुळस,रान तुळस ईत्यादी तुळशींचे अनेक प्रकार आहेत. तुळसीच्या मंजिरी,पाने,तुळसीच्या बीया,तुळसीचे काष्ठ,तुळसींची मुळे इत्यादींचा उपयोग औषधी म्हणुन केला जातो ह्याचं कारणास्तव तुळशीला आयुर्वेदाची राणी म्हणतात.या उपरोक्त ज्यांच्या अंगणात तुळस फुललेली असते तेथील वातावरण सकारात्मक व उर्जावान असते ह्यात तिळमात्र शंका नाही.ह्या सर्व सकारात्मक बाजूंचा विचार करूनचं अनादी काळापासुन तुळसींची पुजा केली जाते तसेचं प्रत्येक वर्षी सुबोधीनी एकादशी ते पौर्णिमेपर्यंत श्रीकृष्णा सोबत तुळसीचे लग्न लावण्याची प्रथा पुर्वापार चालत आली आहे. ह्या अनुषंगाने शिवाजी चौक स्थित सुधाकर गांजरे यांच्या राहत्या घरी तुळसी विवाहानिमित्त मान्यवरांच्या हस्ते 101 कृष्णतुळसींचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे



आयोजन छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त गजानन मुलंगे ह्यांनी केले.कार्यक्रमाकरिता सचिन गांजरे अध्यक्ष जय लखमा डि.एम. एल.टी.पॅरामेडीकल कॉलेज रिसोड,सौ.अर्चना गांजरे संचालिका गंगोत्री वृध्दाश्रम केलसुला प्रामुख्याने उपस्थित होते.अनेक कुटूंबातील भरकटलेल्या वातावरणाबद्दल खंत व्यक्त करताना मुलंगे म्हणाले की,सद्यस्थितीत भ्रमणध्वनीच्या अतिवापरामुळे लहान मुलेचं नव्हे तर मोठी माणसे सुध्दा भ्रमिष्ट झाली आहेत. साधारणतः 50 वर्षापुर्वी प्रत्येक घराच्या अंगणात सायंकाळी तुळसी वृंदावनापुढे कुटुंबातील लहान धाकटी मंडळी आई किंवा थोरल्या बहिणी सोबत "शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा..." ही प्रार्थना म्हणत असतं पण आज रोजी घरापुढे तुळसी वृंदावनचं नसल्याकारणाने सदरहू प्रार्थना बंद झाली आहे. हिंदू संस्कृतीच्या दृष्टिकोनातून हि बाब फार घातक आहे.पारदर्शक धार्मिकता,सुसंस्कृत पिढी,सामाजिक एकात्मतेचा भाव,शुद्ध वातावरणाची निर्मिती इत्यादी करिता तुळशी विवाह सारख्या कार्यक्रमाची आज रोजी नितांत आवश्यकता आहे.

# वाशिम जिल्हा पोलीस सायबर जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार

## गहाळ मोबाईल शोधून नागरिकांना परत

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

**वाशिम:-**जागतिक सायबर जनजागृती महिला निमित्त वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशीम येथे सायबर जनजागृती कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. आधुनिक युगातील वाढते ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांवर नियंत्रण आणण्यासाठी व नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाला माननीय पोलीस महानिरीक्षक (IG) श्री रामनाथ पोकळे, जिल्हा पोलीस अधीक्षक श्री अनुज तारे, तसेच अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड यांच्या प्रमुख उपस्थिती मुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध भागातील पोलीस पाटील तसेच सुमारे 300 नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सायबर पोलीस स्टेशन, वाशिम यांच्या माध्यमातून नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण सेवा उपक्रम हाती घेण्यात आला. गहाळ व चोरीस गेलेले एकूण 115 मोबाईल फोन शोधून त्यांच्या संबंधित मालकांना परत देण्यात आले, ज्यांची एकूण किंमत अंदाजे 11,725 ,000 इतकी आहे. याशिवाय, गेल्या वर्षभर सायबर पोलिसांनी 368 मोबाईल फोन परत मिळवून दिली, ज्यांची किंमत सुमारे रुपये



31 ,55,20,000 इतकी आहे हे जिल्हा पोलिसाची उल्लेखनीय यश मानले जात आहे.

याचबरोबर NCCR पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन फसवणुकीत नुकसान झालेल्या नागरिकांच्या पैसा परत मिळवून देण्यात आला. संबंधित नागरिकांचा सन्मान श्री रामनाथ पोकळे यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सायबर पोलिसांबद्दल विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

कार्यक्रमात सायबर पोलिस आणि सोशल मीडिया मॉनिटरिंग चे कार्य, सायबर गुन्ह्याचे प्रकार, सोनू की पासून बचावाचे मार्ग, आणि प्रत्यक्ष केस स्टडी यांच्या माध्यमातून जनजागृती केली. उपस्थित त्यांना सायबर सुरक्षा उपाययोजना, सुरक्षित व्यवहार तंत्र, आणि सोशल मीडिया वापरातील सावधानता याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान 'सायबर जनजागृती मार्गदर्शक पुस्तिका' अनावरण माननीय (IG) श्री रामनाथ पोकळे. यांच्या हस्ते करण्यात आले.

सायबर गुन्ह्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व नागरिकांमध्ये सायबर सुरक्षा बाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने वाशिम सायबर पोलीस स्टेशनचा हा उपक्रम अत्यंत प्रशंसनीय आणि अनुकरणीय ठरला आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्थांकडून आणि नागरिकांकडून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# देवा , आता तरी अंत पाहू नको...! पालोद परिसरात मक्याच्या कणसांना फुटले कोंब,कपाशीची बोंडे सडली

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** शहरातील व तालुक्यात गेल्या सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीने आधीच पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे.आता पालोदसह, अन्वी, डोंगरगाव, दहिगाव, रहिमाबाद ,आसडी , मंगरूळ,चांदापुर,चिंचपुर, लिहा खेडी,मांडणा, सारोळा, आदी गावांमध्ये उरलीसुरली पिकेही बेमोसमी पावसाने खराब होत आहेत. सोगणी करून शेतात पडून असलेल्या मक्याच्या कणसांना कोंब फुटत आहेत, तर कपाशीची बोंडे सडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले थोडेफार उत्पन्नही हिरावून घेतले जात आहे.

खेळणा नदीला सप्टेंबरमध्ये आलेल्या महापुरामुळे शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली,तर अनेक शेतकऱ्यांची नदीकाठची



शेती खरडून निघाली.या नैसर्गिक आपत्तीत शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले होते.या संकटातून शेतकरी सावरतही नाही, तोच गेल्या आठवड्यापासून बेमोसमी पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे.अतिवृष्टीतून वाचलेला मका आणि काढणीस आलेला कापूस पुन्हा पावसाच्या तडाख्यात सापडला आहे.परिणामी, कपाशीची बोंडे सडत आहेत. मक्याच्या पिकाला अंकुर फुटण्याचे चित्र पाहायला मिळत आहे.गेल्या दहा ते बारा दिवसांपासून होत असलेल्या पावसाने पालोद परिसरातील व तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मकाच्या कणसांना अति प्रमाणात कोंब फुटले असून कापसाच्या बोंडांना सड लागली आहे.तरी पण शेतकरी बांधवांना शासनाकडून अजून मदतीची प्रतीक्षाच करावी लागत आहे.

सप्टेंबरमध्ये अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांची शेती, जनावरे आणि शेतीची अवजारे पुराच्या पाण्यात वाहून गेली होती... सरकारने या नुकसानीची पाहणी करून मदत जाहीर केली असली तरी,आजपर्यंत मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही.अशातच अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून, शेतकरी वर्ग पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

# एक ऊब जाणिवेची'चा दिवाळी संदेश : ३११ घरांत उजळले मानवतेचे दिवे

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

**कारंजा :** (लाड)दिव्यांचा सण म्हणवणारी दिवाळी काहींसाठी उत्सव असते,तर काहींसाठी अंधार. पण 'एक ऊब जाणिवेची' या संस्थेने गेल्या काही वर्षांत त्या अंधाराला आशेचा प्रकाश दिला आहे.यंदाच्या दिवाळीत संस्थेने ३११ घरांत आनंद,गोडधोड आणि माणुसकीचा उजेड पोहोचवला आहे. या संस्थेचा प्रवास मनातल्या एका साध्या विचारातून सुरू झाला."आपल्या कपाटात पडलेले कपडे कुणाच्या उपयोगी आणू शकतात." कारंजातील काही स्वयंसेवकांनी कपडे गोळा केले,स्वच्छ केले, शिवले आणि गरजूंना दिले.ही कृती हळूहळू "मदतीचा महोत्सव" बनली.कोरोनाच्या काळात कपडे गोळा करणे थांबले,पण त्याऐवजी



सदस्यांनी आपापल्या उत्पन्नातून निधी उभारला.त्या पैशातून निराधार, अनाथ,गरीब कुटुंबांसाठी किराणा आणि कपड्यांचे वाटप सुरू झाले.काही दानशूर लोकांनी आपले वाढदिवस,स्मृतिदिन, अगदी तेरवीचे खर्चसुद्धा वाचवून संस्थेकडे निधी दिला.या प्रेमाच्या प्रवाहातून 'दत्तक कुटुंब योजना' जन्माला आली.आज ८० ते १०० कुटुंबांना मोफत किराणा, कपडे आणि औषधे मिळतात.

आपल्या घरात दिवे लागतीलच, पण जेथे अंधार आहे,तिथेही उजेड पोहोचवूया," या भावनेतून दरवर्षी 'मिशन दिवाळी' राबवले जाते.यंदा वाशीम,अकोला, यवतमाळ आणि पालघर जिल्ह्यांतील १०१ गावांमध्ये ३११ कुटुंबांना किराणा किट, मिठाई,फराळ व कपड्यांचे वाटप करण्यात आले.

संस्थेचे कार्यकर्ते सांगतात,"खरी दिवाळी म्हणजे माणुसकीच्या दिव्यांचा उत्सव. कारंज्यापासून ६०० किमी दूर असलेल्या पालघरपर्यंत हा उजेड पोहोचला आहे. कुपट्याच्या शांताबाई ढोक यांच्या घरात यंदा वर्षानुवर्षांनंतर दिव्यांचा उजेड लागला. "किराणा,फराळ,लुगडं घेऊन आलेले कार्यकर्ते म्हणजेच माझ्या आयुष्यातले देव," त्या म्हणतात.अशा प्रत्येक हसऱ्या चेहऱ्यांतच 'एक ऊब जाणिवेची'चा खरा प्रकाश दडलेला आहे.

# उमरी येथे वंचित बहुजन आघाडीची भव्य सभा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**
**युवा नेते सुजात आंबेडकर यांचे मार्गदर्शन**

उमरी येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आयोजित भव्य जाहीर सभेला युवा नेते सुजात आंबेडकर यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात सुजात आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जनसंपर्क दौरा सुरू असून, निवडणूकपूर्व तयारीसाठी विविध जिल्ह्यांमध्ये सभा घेतल्या जात आहेत. या सभांमधून पक्षाचे ध्येयधोरण, सामाजिक न्यायाची विचारधारा, प्रचार यंत्रणेचा प्रभावी वापर आणि बूथस्तरावरील संघटनबांधणी यावर विशेष भर दिला जात आहे.




या सभेला वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे राज्य प्रवक्ता कैलास वाघमारे, नांदेड जिल्हाध्यक्ष शिवा नरंगळे, तसेच प्रशांत इंगोले, श्याम कांबळे यांसह पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूरच्या लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठास सात कोटी रुपयांचा निधी

**नागपूर :** नागपूर येथील लक्ष्मी नारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेस जीव रसायनशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र आणि जैव तंत्रज्ञान विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी तसेच विद्यापीठाच्या नियमित कामकाज संचालनासाठी पाच वर्षांच्या कालावधीमध्ये चार समान हप्त्यांमध्ये सात कोटी रुपयांचा निधी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार लक्ष्मी नारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्था या संस्थेस सन 2025 - 26 ते सन 2029 - 30 या पाच वर्षांच्या कालावधीत दरवर्षी 1 कोटी 75 लाख रुपयांना प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पहिला हप्ता एप्रिल ते जून 2026 दरम्यान देण्यात येणार आहे. या संस्थेची स्थापन 1942 ला झाली आहे. ही संस्था मध्य भारतातील रसायन तंत्रज्ञान क्षेत्रातील नावाजलेली संस्था असून रसायन तंत्रज्ञान क्षेत्रात पदवी ते संशोधन या टप्प्यात कार्य करते. या संस्थेला 2023 मध्ये अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे.

# भूमी वर्ल्डच्या 'इन्फ्रा 4.0' व्हिजन अंतर्गत भिवंडीत शहरी भारताचे भविष्य आकार घेत आहे

**दैनिक युवक आधार**
**भिवंडी, वार्ताहर**

भारताच्या शहरी भविष्यासंदर्भात बोलताना बहुतेक वेळा मुंबई किंवा बेंगळुरूसारखी महानगरे चर्चेच्या केंद्रस्थानी असतात. मात्र, मुंबईच्या ईशान्येला अवघ्या 40 किलोमीटरवर असलेले भिवंडी शांतपणे पण ठोसपणे परिवर्तनाच्या नव्या प्रवासात आहे. "गोडाउन कॅपिटल" म्हणून ओळखले जाणारे हे शहर आता भारताच्या पुढील पिढीच्या एकात्मिक शहरी परिसंस्थेचे मॉडेल म्हणून उभे राहत आहे. भूमी वर्ल्डच्या 'इन्फ्रा 4.0' व्हिजन अंतर्गत, भिवंडीचे रूपांतर पारंपरिक औद्योगिक केंद्रातून एका सक्रिय, बहुउद्देशीय केंद्रात होत आहे जिथे लॉजिस्टिक्स, व्यावसायिक आणि निवासी विकास एकाच सुसंगत आराखड्यात एकत्र येत आहेत. ही पुढाकार भारताच्या शहरी उत्क्रांतीतील एक नवे पर्व दर्शवते जिथे औद्योगिक उपनगरं स्वयंपूर्ण शहरांमध्ये रूपांतरित होत




आहेत, जी उत्पादनक्षमतेसोबत जीवनमानालाही प्रोत्साहन देतात.

भिवंडी परिवर्तनाचा आराखडा तीन प्रमुख आधारस्तंभांवर उभा आहे. पहिला 'प्रॉक्सिमिटी इकॉनॉमिक्स' विद्यमान लॉजिस्टिक पायाभूत सुविधांचा प्रभावी वापर करून निवासी आणि व्यावसायिक क्षेत्रे एकत्रित केल्याने अधिक कार्यक्षमता निर्माण होते आणि शहरी ताण कमी होतो. दुसरा 'ब्राउनफील्ड ॲडव्हांटेज' आधीपासून विकसित औद्योगिक क्षेत्रांचे पुनर्रचना करून ग्रीनफील्ड प्रकल्पांच्या तुलनेत सुमारे 60 टक्के अधिक भांडवली कार्यक्षमता साध्य करता येते. या क्षेत्रांमध्ये आवश्यक सुविधा, प्रशासनिक रचना आणि जोडणी आधीपासूनच उपलब्ध असल्याने विकासाचा वेग वाढतो. तिसरा 'लिव्हिंग-वर्किंग बॅलन्स' येणाऱ्या दशकातील कामगार वर्गाला केवळ करिअर वाढच नव्हे, तर गुणवत्तापूर्ण जीवनमानही अपेक्षित आहे. त्यामुळे मिश्र-वापर औद्योगिक केंद्रे ही भारताच्या पुढील शहरी विकासाची नवी ओळख ठरणार आहेत.

प्रकाश पटेल, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, भूमी वर्ल्ड म्हणाले,"भिवंडीतील परिवर्तन ही केवळ शहराची नव्याने उभारणी नाही, तर ती एक व्यापक दृष्टी आहे जिथे औद्योगिक वाढ आणि मानवी विकास हातात हात घालून पुढे जातात. 'इन्फ्रा 4.0'च्या माध्यमातून आम्ही फक्त इन्फ्रास्ट्रक्चर उभारत नाही आहोत, तर नवकल्पना, शाश्वतता आणि गुणवत्तापूर्ण जीवनशैलीला आधार देणारी एक परिसंस्था तयार करत आहोत. भिवंडीमध्ये भारताने जबाबदारीने वाढ कशी साधावी नवे बांधण्याऐवजी जुन्या औद्योगिक शहरांना नव्याने घडवून, याचे आदर्श उदाहरण बनण्याची क्षमता आहे."

के.के.दुर्राज,अध्यक्ष-क्रेडाई एमसीएचआय भिवंडी युनिट म्हणाले,"भिवंडी हे महाराष्ट्रातील योजित शहरी विकासाचे पुढील सीमारेषेवरचे शहर आहे. त्याचे धोरणात्मक स्थान, मजबूत पायाभूत रचना आणि भूमी वर्ल्डसारख्या डेव्हलपरच्या मिश्र-वापर विकासाच्या संकल्पना यांमुळे भिवंडी हे भारतातील भावी औद्योगिक शहरांचे प्रोटोटाइप म्हणून उदयास येत आहे. एमसीएचआयला ठाम विश्वास आहे की दूरदर्शी डेव्हलपरच्या नेतृत्वाखालील ब्राउनफील्ड ट्रान्सफॉर्मेशनच पुढील दशकातील शाश्वत शहरीकरणाचा पाया ठरेल."

भूमी वर्ल्डच्या मास्टरप्लॅनमध्ये शिक्षण, आरोग्यसेवा आणि हिरवी सार्वजनिक स्थळे यांचा समावेश असून, रहिवासी आणि व्यावसायिक दोघांसाठीही संपूर्ण आणि संतुलित वातावरण निर्माण करण्यावर भर दिला आहे. भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणी स्थित असलेले भिवंडी, प्रमुख राष्ट्रीय महामार्ग आणि येऊ घातलेला मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग यांच्या जवळ आहे, तसेच लवकरच मेट्रो कनेक्टिव्हिटीही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भिवंडीला टियर-1 दर्जाची जोडणी टियर-3 खर्चात मिळते आणि त्यामुळेच ते दूरदृष्टी असलेल्या गुंतवणूकदार व कॉर्पोरेट संस्थांसाठी आकर्षक ठिकाण ठरत आहे.

# राज्यसेवा परीक्षेत यश मिळवणाऱ्या प्रकाश बडे यांचा आमदार सुरेश धस यांच्या हस्ते गौरव

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

पाटोदा तालुक्यातील मौजे सोने सावरगाव (सोने) येथील श्री.प्रकाशकुमार महादेव बडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा परीक्षा-२०२५ मध्ये NT प्रवर्गातून ५९९ गुण मिळवत राज्यात १४ वा क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पाटोदा तालुक्याचे नाव राज्यात अभिमानाने झळकले आहे.



या उल्लेखनीय यशाबद्दल प्रकाश बडे यांचा आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते विशेष गौरव सन्मान करण्यात आला. शनिवारी आयोजित समारंभात आमदार धस यांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या यशाचा गौरव केला. या वेळी जिल्हा परिषद सदस्य माऊली जरांगे, भाजपा तालुकाध्यक्ष भागवत येवले, राहुल नागरगोजे, सहशिक्षक बडे, अंगद सांगळे, संदीप जाधव यांच्या सह अधिकारी, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्कार सोहळ्यात बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले,"पाटोदा तालुक्यातील ग्रामीण पार्श्वभूमीवरूनही युवक मोठ्या ध्येयाने आणि परिश्रमाने राज्यसेवा सारख्या अवघड परीक्षेत यश संपादन करत आहेत, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. प्रकाश बडे यांनी दाखवून दिले की इच्छाशक्ती आणि मेहनत असेल तर कुठलेही लक्ष्य अशक्य नाही. अशा विद्यार्थ्यांनी आजच्या युवकांसाठी प्रेरणास्थान व्हावे."प्रकाश बडे यांच्या कर्तृत्वाचा अभिमान व्यक्त करत आमदार धस यांनी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि "पाटोदा तालुक्यातील युवकांनीही या पासून प्रेरणा घेऊन स्पर्धा परीक्षांमध्ये उतरावे" असे आवाहन केले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# श्री माणकेश्वर वाचनालयाची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड शहरातील वाचन संस्कृतीला चालना देणारे आणि केंद्र सरकारचा राजाराम मोहन रॉय पुरस्कार प्राप्त असलेले श्री माणकेश्वर वाचनालय यांची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष मधुकरराव शेलार यांच्या अध्यक्षतेखाली वाचनालयाच्या सभागृहात उत्साहात पार पडली.

सभेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, न्या. महादेव गोविंद रानडे आणि संस्थापक यांच्या प्रतिमापूजनाने झाली.



यावेळी वाचनालयाच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट वाचक पुरस्कार अश्विनी बर्वे यांना ट्रॉफी, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आला. तसेच संचालक डॉ. महेश बनकर यांनी वाचनालयास धार्मिक पुस्तके भेट दिली.

सभेत वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, ऑडिट मेमो, अंदाजपत्रक आणि ऑडिटर नेमणुकीस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना अध्यक्ष मधुकरराव शेलार आणि चिटणीस बाळासाहेब कापसे यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

यावेळी नगरपंचायतीचे सभापती साहेबराव बर्डे, संदीप जेऊघाले, डॉ. उत्तम डेर्ले तसेच सीमा भांडारकर, देवदत्त कापसे, सुरेश धारराव, रफिक शेख आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास निफाडमधील विविध क्षेत्रांतील मान्यवर, संचालक मंडळ, ग्रंथमित्र आणि वाचनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेचे प्रास्ताविक अध्यक्ष मधुकरराव शेलार यांनी केले, अहवाल वाचन बाळासाहेब कापसे यांनी केले, सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र सोमवंशी यांनी मानले

# निवघा येथे कार्तिकी एकादशी निमित्त यात्रा व महाप्रसाद कार्यक्रम उत्साहात पार पडला

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**

आज कार्तिकी एकादशी निमित्त निवघा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी धार्मिक श्रद्धा व भक्तिभावाच्या वातावरणात यात्रा व महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार मा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी उपस्थित राहून हनुमान मंदिर व विठुरायाचे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे जाऊन दर्शन



घेतले.

या प्रसंगी भोकर विधानसभा नेते पप्पू पाटील कोंडेकर, काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष प्रतापराव देशमुख बारडकर, दादाराव पुयड नागेलीकर, गणपतराव शिंदे, श्रीनिवास महादवाड तसेच गावातील सर्व भाविक भक्त, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गावकऱ्यांच्या वतीने मा. खासदार रवींद्र चव्हाण साहेबांचा सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण गावात भक्तीमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

# परिस्थितीवर मात करत आदिवासी समाजातील गणेश गायकवाड होणार डॉक्टर

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

तालुक्यातील धनज येथील एका आदिवासी बहुल गावातील आणि अल्पभूधारक शेतकऱ्याचा मुलगा गणेश बाबुराव गायकवाड यांचा नंबर हेगडेवार मेडिकल कॉलेज संभाजीनगर येथे MBBS साठी नंबर लागला आहे त्याची घरची परिस्थिती अतिशय बिकट आई-वडील शेतकरी अनेक अडचणी असतानाही प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गणेश गायकवाड याने पहिल्याच प्रयत्नात ‘ कोणतेच क्लास न लावता नीट’ परीक्षेत 330 गुण घेऊन हेगडेवार



मेडिकल कॉलेज संभाजीनगर येथील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश निश्चित केला आहे. गणेश चे प्राथमिक शिक्षण हे धनज येथील जिल्हा परिषद शाळेत झाले, तर 5 वि ते 12 वि शिक्षण भावना पब्लिक स्कूल रिसोड येथे झाले, गणेश चे आई वडील हे अल्पशिक्षितच माळरानात डोंगरावर असलेली मोजकीच शेती त्यामध्ये नापिकी, कुटुंबाचा खर्च भागणे अवघड बनल्याने त्यांनी कधी आदिलाबाद येथे कापूस वेचणी व ऊसतोडणीचे काम केले तर कधी हळद काढणी करून मुलाच्या शिक्षणात परिस्थितीला आड येऊ दिले नाही,काबाडकष्ट करून मुलाला शिकवले त्यामुळेच आज मुलाच्या यशामुळे गायकवाड कुटुंबीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही. गणेश गायकवाड याने अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेल्या या यशाने त्याचे परिसरातून कौतुक होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने जिल्हा परिषद जवखेडा सर्कल गटातून किंवा चिंचखेडा पंचायत समिती गणातून उमेदवारी दिल्यास निवडणूक लढविण्यास जोमाने तयार :-अशोक म्हस्के

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी - अनिल ससाने**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजित दादा पवार साहेब तसेच महाराष्ट्र प्रदेश सुनील तटकरे साहेब, सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्याचे प्रदेश अध्यक्ष सुनील मगरे साहेब,जालना जिल्हाचे जिल्हा अध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण साहेब, सामाजिक न्याय विभागाचे जालना जिल्हाअध्यक्ष प्रभाकर घेवंदे साहेब, जाफ्राबाद तालुक्याचे अध्यक्ष दत्तू अंभोरे यांच्या मार्गदर्शन खाली जवखेडा ठेंग जिह्वा परिषद सर्कल मध्ये निवडणूक लठविण्याच्या कामास जोमाने तयारीला लागले आहे.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने जिल्हा परिषद जवखेडा सर्कल किंवा पंचायत समिती चिंचखेडा गणातून निवडणूक लढविण्यास तयार आहे. मी गेल्या दोन वर्षापासून (अजित दादा गट)राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचेसामाजिक न्याय विभाग जाफ्राबाद तालुका अध्यक्ष म्हणून प्रामाणिकपणे काम करत आहे आणि पक्षाच्या वाढीसाठी कार्यकर्ते मोठ्या संख्येने पक्षात जोडलेले आहे.यासाठी जाफराबाद येथे सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुका पदाधिकारी



तसेच जाफराबाद तालुक्यातील मातंग समाजाचे सर्व कार्यकर्ते या बैठकीत उपस्थित होते. सर्वांच्या मते जवखेडा ठेंग जिल्हा परिषद सर्कल गटातून लता अशोक म्हस्के निवडणूक लढविण्यास जोमाने तयारीला लागले आहे. तसेच चिंचखेडा या पंचायत समिती गणनातून अशोक चंद्रभान म्हस्के(राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभागाचे जाफ्राबाद तालुका अध्यक्ष) राहणार हिराबळी ता. जाफ्राबाद यांनी उमेदवारी करावी असे सर्वांनी जाहीर केले. जिल्हा परिषद सर्कल जवखेडा ठेंग गटातून लता अशोक म्हस्के व अशोक चंद्रभान म्हस्के यांना सर्व कार्येकर्ते या गणातून मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी, प्रत्येक गावात जाऊन सर्व समाजाच्या मतदार राजांना भेटून,सांगून मतदान करून घेऊन निवडून आणण्यासाठी सर्वजण प्रयत्न करतील असे ठामपने सांगितले. जिल्हा परिषद जवखेडा ठेंग सर्कल मधून लता अशोक म्हस्के व चिंचखेडा या पंचायत समिती गणनातून अशोक चंद्रभान म्हस्के(राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभागाचे तालुका अध्यक्ष) यांनी या दोन्ही पैकी एक निवडणूक लढवावी म्हणून सर्वांनी माझे व माझ्या पत्नीचे सर्वांनी अभिनंदन केले. बैठकीस आलेल्या सर्व सामाजिक न्याय विभाग जाफराबाद तालुका पदाधिकारी व मातंग समाजाच्या कार्यकर्त्यांचे मी आभार मानले.

# भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते**

मुदखेड येथील माजी पोलिस पाटील बौद्ध उपासक भिमराव संभाजी कांबळे यांचे आज दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ३:३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या निधनाने मुदखेड परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांची अंत्ययात्रा आज दि. ४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता त्यांच्या राहत्या घरातून भिमनगर, मुदखेड येथून निघून बौद्ध स्मशानभूमी येथे पार



पडणार आहे.

त्यांच्या पश्चात परिवार, नातेवाईक, स्नेहीवर्ग असा मोठा परिवार आहे.त्यांच्या आत्म्यास शांती लाभो — भावपूर्ण श्रद्धांजली.

# श्री गुरु तेग बहादूर यांच्या 350 व्या शहीदी शताब्दी समागम कार्यक्रमासाठी 95 कोटी 35 लाखांची तरतूद

शिख धर्माचे नववे गुरू आणि “हिंद-की-चादर” म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागम वर्षानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या भव्य राज्यस्तरीय महोत्सवासाठी ९५ कोटी ३५ लाख ६४ हजार रूपये उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १३ जून २०२५ रोजी “हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम” बाबत बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत राज्यस्तरीय समन्वय समिती, क्षेत्रीय आयोजन समित्या आणि विविध व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.श्री गुरु तेग बहादुर यांनी १७ व्या शतकात धर्मरक्षा, मानवी हक्क आणि अन्यायाविरुद्ध निर्भीड आवाज उठवून बलिदान दिले. त्यांचे प्रवचन आणि भजन “गुरु ग्रंथ साहिब” मध्ये समाविष्ट असून त्यांनी परोपकार, सेवा, साधेपणा आणि आध्यात्मिकतेचा आदर्श दिला. त्यांच्या या कार्याला अभिवादन म्हणून राज्यभरात नांदेड, नागपूर आणि खारघर या तीन प्रमुख केंद्रांतर्गत विविध जिल्ह्यांमध्ये कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहेत. ते पुढीलप्रमाणे असे नांदेड (दि. १६ नोव्हेंबर २०२५): छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, बीड, नंदुरबार, धुळे, जळगाव, सोलापूर. नागपूर (दि. ६ डिसेंबर २०२५) : नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम. खारघर, जि.रायगड (दि. २१ डिसेंबर २०२५): मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक.

# जि. प. शाळा भातोड़ी येथे माजी जिल्हा परिषद सदस्य शालीकराम पाटील म्हस्के त्यांच्यामार्फत मोफत वह्या वाटप

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी - अनिल ससाने**

भातोडी तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथे जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

उपक्रमांतर्गत आज भातोड़ी येथील सरपंच भारती मधुकर गोफणे व कारभारी चव्हाण शा. व्या. समीती अध्यक्ष यांच्या हस्ते जि. प. शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.*प्रसंगी अरुण भोरे उपसरपंच भगवान ऊगले



माजी शा. व्या समीती अध्यक्ष रविन्द्र ऊगले माजी शा व्या समीती अध्यक्ष रामदास चव्हाण ग्रामपंचायत सदस्य, आंगनवाड़ी ताई आनंदीबाई शेळके, कमलबाई गोफणे रामनाथ ऊगले युवा भाजपा नेते मोहन चव्हाण सुरेश ऊगले सुनील ऊगले सोनाजी ऊगले दत्तात्रय चव्हाण मधुकर गोफणे सर खांडेभराड सर, बनकर मैडम, खराडे मॅडम, व ग्रामस्त उपस्थित होते....

# मच्छिमारांना कर्जावर चार टक्के व्याज सवलत,किसान क्रेडिट कार्डधारकांना मोठा दिलासा

**दैनिक युवक आधार**

राज्यातील मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादकांसह किसान क्रेडिट कार्ड (KCC) धारक मत्स्यव्यावसायिकांना २ लाख रूपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या खेळत्या भांडवली कर्जावर चार टक्के व्याज परतावा सवलत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे हजारो मच्छिमार कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. ताजे मासे उत्पादन, संवर्धन आणि साठवण व्यवस्थापनाला यामुळे बळकटी मिळणार आहे.

या योजनेचा लाभ मच्छिमार, मत्स्यकास्तकार, मत्स्यउत्पादक, मत्स्यव्यवस्थापन करणारे, मत्स्यबीज संवर्धक, मत्स्यबोटुकली संवर्धन करणारे तसेच Post Harvesting टप्प्यात वर्गीकरण, प्रतवारी, आवेष्ठन आणि साठवणूक करणाऱ्यांना मिळणार आहे. घेतलेले अल्पमुदतीचे खेळते भांडवली कर्ज हे उचल केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत परतफेड करावे लागणार आहे.

व्याज परताव्याची प्रक्रिया सहकार विभाग व संबंधित बँकांच्या माध्यमातून केली जाणार आहे. शेतकऱ्यांना ज्या पद्धतीने पीककर्ज मिळते, त्याच धर्तीवर मच्छिमारांना हे खेळते भांडवली कर्ज उपलब्ध करून देण्यात येईल. राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या योजनेत सहभागी राहतील.

या योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर सहाय्यक आयुक्त (मत्स्यव्यवसाय) आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना समन्वय साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# वाहनांवर काळ्या काचा लावणाऱ्यांच्या प्रमाणात वाढ

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

वाहनाला काळ्या काचा लावल्यास त्या वाहनातून प्रवास करणाऱ्या व्यक्तीबाबतची माहिती इतरांना होत नाही. यातून काही अनुचित प्रकार घडू शकतात. त्यामुळे काळ्या काचा लावून फिरणा-यांवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच चारचाकी वाहनांच्या कांचाना काळ्या फिल्म लावल्यास वाहनधारकाला दंड करण्याची तरतूद मोटार वाहन कायद्यात आहे. मात्र पोलिसांकडून अशा वाहनधारकांविरोधात पाहिजे त्या प्रमाणात आजही कारवाई करण्याबाबत चालढकलपणा केला जात असल्याने आजमितीस शहराच्या विविध भागात काळ्या काचा लावून मिरविणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे.पनवेल, उरण,नवी मुंबई आदी ठिकाणी चार चाकी वाहनांना काळ्या काचा लावणाऱ्यांचे प्रमाण वाढू लागलेले दिसून येत आहे. पनवेल व उरण, नवी मुंबई परिसरात अनेक वाहनांवर काळ्या काचा लावलेली वाहने रस्त्यांवरून धावतांना दिसतात. पनवेल तालुका आणि पनवेल महानगरपालिका हद्दीत चार चाकी वाहनांच्या काचांना काळ्याकाचा लावलेल्या दिसत आहेत. या काळ्या काचामुळे सदर गाडीमध्ये कोण बसले आहे हे देखील समजत नाही. यात पत्रकार आणि पोलीस देखील मागे नाहीत. त्यांच्या गाड्यांना देखील काळ्या काचा लावलेल्या दिसतात. आलिशान कार आणि त्याला काळ्या काचा लावून फिरण्याचा मोह वाहनचालकांना आवरत नाही. काळ्या काचांच्या वापरावर बंदी असूनही पनवेल परिसरात त्यांचा सर्रास वापर केला जात आहे. दरम्यान, परिवहन विभागाच्या परवानगीने तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना आपल्या वाहनांवर काळ्या काचा लावण्याची मुभा आहे. अनेकदा समाजकंटकांकडून गैरकृत्य, गुन्हे करण्यासाठी काळ्या काचांचा गैरवापर होण्याचा धोका असल्याने काळ्या काचा वापरण्यावर बंदी घालण्यात आली. मात्र ही बंदी नावापुरतीच असल्याचे एकंदरीत परिस्थितीवर अधोरेखित होतांना दिसते. वाहनांना काळ्या फिल्म लावल्यास कारवाईची तरतूद असली तरी याविषयी फार गांभीयाने कारवाई होत नसल्याने काळ्या फिल्म लावून चारचाकी वाहने शहरातील रस्त्यांवरून धावतांना दिसतात. दरम्यान, वाहनाला काळ्या काचा लावून फिरल्यास सुरुवातीला ५०० रूपयांचा दंड आकारला जातो. मात्र त्याच वाहनधारकाने दुसऱ्यांदा नियमांचे उल्लंघन केल्यास १५०० रूपयांचा दंड आकारला जातो. दरम्यान, अधिकृत पत्रकार किंवा माध्यम प्रतिनिधी यांना आपल्या वाहनांवर 'प्रेस' असा शब्द लिहून फिरू शकतात. मात्र पत्रकारिता क्षेत्रातील कसलीही जाण नसतांना दुचाकी व चारचाकी वाहनांवर सर्रासपणे 'प्रेस' असा शब्द लिहून मिरविण्याचे प्रकारही पनवेल परिसरात होतांना दिसतात. सदरचा प्रकार करणाऱ्या व्यक्तींचे वाहन हे कोणत्याही प्रसारमाध्यमाशी नोंदणी केलेले नसते, परंतु अनेकदा लोकांना फसवण्यासाठी किंवा ब्लॅकमेल करण्यासाठी तसेच पोलिसांची कारवाई टाळण्यासाठी अशा व्यक्तींकडून आपल्या वाहनांवर 'प्रेस' लिहून मिरवण्याचे प्रकार पनवेल परिसरात होतांना दिसत असल्याने अशा व्यक्तींवर पोलिस, वाहतूक पोलिस व आरटीओ यंत्रणांनी कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# रेशन दुकान नंबर 9 आणि 17 चा परवाना रद्द

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रेशन धान्य दुकानाविरोधात विविध प्रकारच्या तक्रारी आल्यामुळे पनवेल तालुक्यातील दुकान नंबर 9 आणि 17 चा परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी रद्द केल्याचे पुरवठा अधिकारी पनवेल यांनी सांगितले.

पनवेल तालुक्यात आणि शहरात एकूण 199 रेशनिंगची दुकाने आहेत. नवीन पनवेल येथील दुकान नंबर 9 आणि 17 बाबत नागरिकांकडून तक्रारी करण्यात आल्या होत्या. याबाबत पुरवठा विभागाने दुकानाची पाहणी केली असता त्या ठिकाणी भाव फलक, साठा फलक नसल्याचे दिसून आले. तसेच संगणकीकृत यादी नाही. धान्य नमुने नाही, भेट पुस्तिका नाही, वेळ फलक नाही, शेरे बुक आणि तक्रार बुक नसल्याचे देखील निदर्शनास आले तसेच दुकानात धान्य देखील कमी आढळून आले आणि लाभार्थ्यांना पावती देखील दिली जात नाही. त्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दुकान नंबर 9 आणि 17 चा परवाना रद्द करण्याचे आदेश दिले. यावेळी दुकानाची 100% अनामत रक्कम शासन जमा करावी तसेच लाभार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून नजीकच्या दुकानाला हे रेशनिंग दुकान जोडण्यात यावे असे आदेश देण्यात आले आहेत.

रेशन दुकाने दररोज ८ तास उघडी असणे गरजेचे आहे. मात्र तालुक्यातील दुकाने महिन्यातून दोन ते तीन दिवसच बहुतांशी उघडे असतात. त्यामुळे महिन्याभरात कधीही येऊन धान्य घेण्यासाठी आलेल्या लाभार्थ्यांना परत जावे लागते. आठवड्यातून

**प्राधिकार पत्र नसताना कोप्रोली येथे रेशनिंग दुकान काही वर्षांपासून सुरू होते. नागरिकांनी केलेल्या तक्रारीनंतर हे रेशनिंग दुकान बंद करण्यात आले. आणि बचत गटाला देण्यात आले. प्राधिकार पत्र नसताना दुकान चालवणे हा गुन्हा आहे. तसे असताना देखील या दुकानदारावर अद्याप देखील गुन्हा दाखल झालेला नाही. याच्या मागे कोणाचा वरदहस्त आहे का असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे.**

फक्त एक दिवस रेशनिंग दुकान बंद ठेवण्याची परवानगी आहे मात्र मोजकेच दिवस दुकाने उघडी असतात. रेशन धान्य लाभार्थ्यांना धान्य बाबत काही तक्रारी असल्यास ते दुकानातील तक्रार वही तक्रार लिहू शकतात मात्र दुकानात तक्रार वहीच नसल्याने काय करायचे असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. रेशन दुकानात लोकांना सुस्पष्टपणे वाचता येईल असा महिती फलक असला पाहिजे. या फलकावर दुकानाची वेळ, सुटीचा दिवस, दुकान क्रमांक, तक्रार वही उपलब्ध असल्याची नोंद, रेशन कार्यालयाचा पत्ता व फोन, भाव व देय प्रमाण, उपलब्ध कोटा ही माहिती असणे अनिवार्य असते. असे बऱ्याच ठिकाणी दिसत नाही. काही दुकानात रेशनकार्ड स्वतःकडे ठेवून घेतले जातात. महिनाभर धान्याचे वितरण करणे करण्याचा शासन नियम असताना त्याला तीलांजली दिली जात आहे. दोन ते चार दिवस धान्याचे वितरण करून दुकानाला लॉक लावले जाते.

# सोलापूरच्या असंघटीत कामगारांच्या 30 हजार घरांचा मार्ग मोकळा

**सोलापूर** : सोलापूर येथील असंघटीत कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या प्रकल्पाला राज्य शासनाची मोठी दिलासादायक मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी अनर्जित, नजराणा रक्कमेसह अकृषिक वापर शुल्कातून सूट देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी येथील दक्षिण सोलापूर येथील रे नगर फेडरेशन आणि संलग्न गृहनिर्माण संस्थांना एकूण २१ हे. आर. ६२ इतकी जमीन शासनाने गृहनिर्माण प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिली आहे. या जमिनींची अनर्जित रक्कम प्रति चौरस मीटर एक रूपया या नाममात्र दराने आकारण्यात येणार आहे.

या निर्णयानुसार २१ हेक्टर ६२ आर जमिनीवरील १६ कोटी ९३ लाख ८९ हजार ३०० रुपयांची अनर्जित रक्कम तसेच आठ लाख पाच हजार २२४ रुपयांची थकीत अकृषिक कर थकबाकी माफ करण्यात येणार आहे.यामुळे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहर व परिसरातील असंघटीत कामगार, मजूर, लघुउद्योग व सेवा क्षेत्रातील कुटुंबांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होणार आहेत.

## सह्याद्री कुणबी संघ पुणे शहर (महाराष्ट्र) पर्वती विभाग आयोजित दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पुणे:-(प्रमोद तरळ)**

सह्याद्री कुणबी संघ पुणे शहर ही संघटना नेहमीच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व तळागाळातील समाजबांधवांसाठी, गोरगरिबांसाठी काम करत असते. त्यातीलच एक सामाजिक बांधिलकी जोपासणारा उपक्रम म्हणजेच दिवाळी फराळ वाटप हा उपक्रम आपण दरवर्षी विविध ठिकाणी राबवत असतो.

यावर्षी आपण श्री छत्रपती प्रतिष्ठान संचालित निवासी मतिमंद विद्यालय (हिंगणे) पुणे येथील मुलांसोबत सामाजिक बांधिलकीची दिवाळी साजरी केली

येथील मुलांना अन्नधान्य, कडधान्य, पेढे, दैनंदिन गरजेच्या वस्तू,दिवाळी फराळ आणि साफसफाई साहित्य देऊन अनोख्या पद्धतीने दिवाळी साजरी केली.

हा कार्यक्रम पर्वती विभाग अध्यक्ष श्री निलेश शिगवण यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला.कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी संघाच्या वतीने सर्व दानशूर समाज बांधवांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत

# धर्माबादेत राष्ट्रवादीला पडला खिंडार - जारिकोटमधील असंख्य कार्यकर्ते आमदार राजेश पवारांच्या नेतृत्वाखाली भाजपात प्रवेश!

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :गिरमाजी सूर्यकार**

नायगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट, जनतेच्या विकासासाठी अहोरात्र कार्य करणारे आमदार मा. राजेशदादा पवार यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून जारीकोट येथील राष्ट्रवादी पक्षाच्या बहुसंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

या वेळी बोलताना आमदार राजेश पवार म्हणाले, "भारतीय जनता पक्ष हा विकास, राष्ट्रभक्ती आणि जनतेच्या कल्याणाचा पक्ष आहे. पक्षात नव्याने प्रवेश करणारे सर्व कार्यकर्ते हेच पुढे संघटनेची नवी ताकद ठरणार आहेत. आपल्या एकजुटीच्या बळावर आपण धर्माबाद आणि संपूर्ण मतदारसंघात विकासाचा दीप अधिक तेजाने प्रज्वलित करू.

या प्रवेशामुळे जरिकोट परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक वाढली असून आगामी निवडणुकांसाठी पक्षाला नवसंजीवनी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

हा प्रवेश सोहळा धर्माबाद शासकीय विश्रामगृह धर्माबाद येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी मा. आमदार राजेश पवार, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य राम पाटील बाळापूरकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वर्णी नागभूषण, भाजपा तालुका अध्यक्ष गुलाब पाटील मोरे, माजी तालुका अध्यक्ष विजय पाटील डांगे शहराध्यक्ष चक्रेश पाटील बण्णाळीकर, माजी शहराध्यक्ष रमेश अण्णा गौड,गुलाब पाटील मोरे तसेच भाजपचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी गणेश पाटील धुप्पे, विजय पाटील सदानंद, यशवंत कमलाकर, द्रुपद इबितवार, शिवा कमलाकर,नागनाथ राजरवार, साहेबराव उपोड, हनुमंत नरवाडे, गंगाधर गंठोड ,प्रकाश येडपलवार ,माधव धुप्पे, संजय येडपवार, लक्ष्मीकांत धुपे ,नारायण पाटील विभुते ,श्रीनिवास विभुते, गंगाधर इंगळे, गणेश कमलाकर, गजानन गादेवार, शिवन्ना कानगुलवार, शिवराज शेंबाळे, दत्तात्रय येडपलवार, दिगंबर कदम, असे असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी प्रवेश केले.

गणेश पाटील धुप्पे यांचे नेतृत्व

प्रवेश करताना कार्यकर्त्यांनी सांगितले की, "मा. राजेशदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली नायगाव मतदारसंघात विकासाची नवी पहाट उजाडली आहे. त्यांच्या कार्यामुळे प्रत्येक गावात रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, आरोग्य आदी सुविधा पोहोचल्या आहेत. अशा विकासाभिमुख नेतृत्वावर आमचा पूर्ण विश्वास असून आम्ही सर्वजण भाजपाच्या विचारधारेत सामील झालो आहोत."

## चित्रकार प्रा. विक्रांत हटकर यांचा "कलासन्मान'' पुरस्काराने गौरव

**दैनिक युवक आधार**
**विश्वदीप कांबळे हादगाव प्रतिनिधी**

स्व. हरिभाऊजी नागतुरे ग्राम विकास बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक संस्था वणी व ऑर्टिस्ट स्पेस नागपुर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चित्र, शिल्प स्पर्धा व प्रदर्शन दि. २८ ते ३०नोव्हें. २०२५ या दरम्यान लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ येथे भरविण्यात आले होते. प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी आयोजित कार्यक्रमात नांदेडचे कलाकार प्रा. विक्रांत हटकर यांना त्यांच्या चित्रकलेतील त्यांच्या कलेला, योगदानाला व त्यातील कार्याबद्दल त्यांना कला सन्मान पुरस्कार देण्यात आला. हटकर हे चित्रकार व प्राध्यापक आहेत, तसेच त्यांचे रेषा व रंग कला आणि व्यक्तिचित्रण यामध्ये ते मास्टर आहेत. त्यांना हा पुरस्कार माहुरचे प्रसिद्ध चित्रकार कलाकार रणजीत दत्त वर्मा यांच्या हस्ते देण्यात आला. त्यासोबत कलाकार प्रा.चंद्रशेखर कुमावत पुणे,कलाकार श्री कैलास घुले नागपूर, कलाकार प्राचार्य एन.डी.पाटील अमरावती ,कलाकार प्राचार्य श्री गजानन बोबडे, अकोला,प्रा.सुवर्णा नागपुरे अकोला, कलाकार प्राचार्य गौरव धवस यवतमाळ, कलाकार मृण्मयी बोबडे अकोला, कलाकार प्राचार्य योगिता शेळके पुसद, कलाकार तुकारामजी पाटणकर पुसद



आदी कलाकारांना पुरस्कार देण्यात आला राज्यस्तरीय चित्रकला प्रदर्शनात ५०० कलारांचे ७००ते ८००पेंटींग चित्रकला प्रदर्शनाला आले होते त्यामध्ये एम.जी.एम. कॉलेज ऑफ फाईन आर्ट, नांदेड च्या प्राजक्ता चौधरी , पद्मावती सोनटक्के, गणेश कुरुडे यांच्या कलाकृती प्रदर्शनाला लागल्या होत्या आणि माहुरचे चित्रकार कलाकार रणजीत दत्त वर्मा यांच्या जलरंगातून साकारलेल्या निसर्ग चित्रणास वणी येथील रसिकांनी कलाआस्वाद घेतला. प्रात्यक्षिक सादर करताना वर्मा यांनी प्रश्नोत्तरातून विद्यार्थी व रसिकांशी संवाद साधला. बक्षिस वितरण सोहळ्याच्या समारोपीय कार्यक्रमात एमजीएम कॉलेज ऑफ फाईन आर्ट नांदेडच्या विद्यार्थी चे मान्यवरांच्या हस्ते कौतुक करण्यात आले तसेच कार्यक्रमाला अध्यक्षा सौ. किरणताई संजय देरर्कर (अध्यक्षा, एकवीरा महिला बँक, मारेगाव) यांच्या हस्ते सर्व कलाकारांना कला सन्मान या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बक्षिस वितरणामध्ये शिल्प विभागासाठी दिवंगत पत्रकार तथा चित्रकार दत्त वर्मा यांच्या स्मृती प्रित्यर्थ पारितोषिके देऊन कलावंतांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजक प्रकाश नागतुरे अध्यक्ष तथा माजी शिक्षणाधिकारी तथा प्रदिप नागतूरे सचिव, प्राचार्य बा. ना. कला महाविद्यालये पुसद् यांच्या संकल्पनेतून स्व हरिभाऊजी नागतुरे यांच्या स्मरणार्थ राज्य स्तरीय चित्र, शिल्प प्रदर्शनाच्या आयोजनाने वणी येथील रसिकांना मिळालेली मेजवाणी अविस्मरनिय ठरली असल्याचे मनोगत सौ.किरणताई संजय देरकर यांनी अध्यक्षीय समारोप केला अशोक सोनटकके, महादेवराव, गजानन कासावार, हरिदास वनस्कर, विजय गंधेवार, गजानन गोडे म. प्रा. शिक्षण परिषदेचे तालुकाध्यक्ष शेषाव संभाजीराव पाटील , कलाकार चंद्रशेखर कुमावत, महेश अण्णापुरे, प्रा. सारंग नागठाणे, प्रा. गजानन बोबडे प्रा. आकाश खोब्रागडे, गणेश नैताम, स्वाती नैताम, अरविंद जाधव यांसह अनेकांनी अभिनंदन करत पुढील कार्यास शुभेच्या दिल्या.

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी तिसऱ्या शक्तीची, तीर्थक्षेत्र देहू येथे बैठक - धनंजय पाटील काकडे

**दैनिक युवक आधार**
**विदर्भ प्रमुख प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील संघर्षशील संघटनांद्वारे नवीन संकल्पना राबविण्यासाठी तिसरी शक्ती साठी एकत्र आणण्याचे काम तुकडोजी - तुकाराम, शिवराज्य आघाडी कडून दि.२ नोव्हेंबर २०२५ रविवारला संध्याकाळी ५ ते ८ तीर्थक्षेत्र देहू( जी.पुणे) येथे बैठक बोलावण्यात आली आहे. तसेच शासन व बँकांनी पाठविलेल्या शेतकऱ्यांना कर्जाच्या नोटिशी, व अवाजवी पाठविलेले शेतातील विद्युत पंपाची बिले, आणि शहर वाशियाचे त्रस्त झालेल्या आकस्मिक कोरोनाचे ससेहोलपटीमुळे, शहरवाशी यांनी घेतलेली घराची कर्जे, व्याजाने वाढत गेली. बँकांनी, फायनन्स कंपनीने बडगा उगारून जप्तीचे, व लिलाव करण्याचे आदेश दिले. त्यामुळे ग्रामीण व शहरी लोक हवालदिल झाले. ग्रामीण व्यवस्थेला कंटाळून शहरीवस्ती फुगली व विकासाच्या नावावर शहरात गर्दी करून धुळघुस घातला.



त्याचे परिणाम जनता व मतदार भोगत आहे. त्या सर्वांचे इंद्रायणी घाटावर नदीत कर्जाचे नोटीशी बुडवून कर्जमुक्ती कार्यक्रम होत आहे. आज राजकीय आघाड्यांनी फक्तं सत्तेत जाण्यासाठी नौटंकी पद्धतीचे मोर्चे आंदोलने, विदर्भात व मराठवाड्यात चालू आहेत. हे फक्त निवडणुक काळातील राजकीय डावपेच आहेत. कर्जमाफी हा फक्त फुसकाबार आहे. शेतकऱ्यांचा शेतीमाल हमीभावाने व रास्त भावाने खरेदी करणे, हाच यावर उपाय आहे. काँग्रेस - बीजेपी यांच्या विरोधात अनेकदा तिसरी आघाडी तयार झाली. परंतु शेवटी सत्तेच्या प्रवाहात काँग्रेस व बीजेपीला पाठिंबा देऊन, महाराष्ट्रात विरोधी पक्ष निस्तनाभूत झाले, असल्याचे चित्र समाजाला व मतदारांना दिसले. सत्तेत कोण आणि विरोधात कोण इतकी भयानक परिस्थिती तयार झाली. हे राजकीय पक्ष फक्त सत्तेत जाण्याच्या उद्देशाने कोण - कोणाशी कुठे, व कधी युती करेल व कशीही भाषा बोलतात, जनतेचा यांच्यावरील आता विश्वास उडाल्यामुळे या सर्व गोष्टीचा पुनर्विचार मतदारांना व जनतेलाच करावा लागेल.आज कोठेही सत्तेतील नेत्याची,सभा भाषणे, असल्यास फक्त शेतकरी नेत्यांना अटक किंवा डिटेन केल्या जाते. म्हणजेच शेतकरी नेते हेच फक्त सरकारचे दुश्मन आहेत कां?


शेतकरी - शेतमजुरांचे प्रश्न, न्याय, हक्क व अधिकार मिळविन्यासाठी ,आयात- निर्यात धोरणे व शेतकरी विरोधी कायदे, स्वतंत्र कृषी न्यायालय , स्वतंत्र शेतकरी मंत्रालय, यासारखे जटिल प्रश्न तयार झाली आहेत. त्यासाठी पुढील दिशा, व्यवस्था व हाऊसमध्ये सोडविण्यासाठी शेतकरी आंदोलक यांचा सत्तेतील सहभाग असणे, ही पुढील काळाची गरज ओळखून तयारी करण्यात येत आहे. आज सत्तेच्या बाहेर रस्त्यावर आणि तेवढ्याच संख्येने हाऊस मध्ये सत्तेत असणारी मंडळी असेल तरच दोन्ही चाके सुरळीत चालतील , तेच खऱ्या अर्थाने गरजेचे आहे. राज्य व केंद्र सरकार मध्ये टिकण्यासाठी पुढील निवडणुकीची दिशा या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निमित्यानेच रूपरेषा व पाया आखल्या जात असतो. म्हणून जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, महानगरपालिका, मध्ये जास्तीत जास्त बहुसंख्येने उमेदवार निवडून येण्यासाठी तुकडोजी - तुकाराम, शिवराज्य आघाडीची बैठक होतं आहे. तसेच दि. 3 नोव्हेंबर 2025 सोमवारला पुणे येथे पत्रकार भवन येथे ( एस.एम.जोशी फाउंडेशन हॉल जवळ, गंज पेठ,पुणे) दुपारी ११:३० ला पत्रकार परिषद होत आहे. तरी सर्व इच्छुक उमेदवारांनी, छोटे - मोठे गटांनी तिसरी शक्तीच्या राजकीय आघाडीसाठी या बैठकीला ( मिडिया व पत्रकारांनी ) सर्वांनी उपस्थित राहावे,असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, शेतकरी- वारकरी, कष्टकरी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष -- धनंजय पाटील काकडे (सरसेनापती ,शेतकरी आंदोलन समिती ९८९०३६८० ५८ ) यांनी केले आहे.

## खोपोली नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये युवा उमेदवारांनी आणलं नव्हे चैतन्य

### टॅग कॉमन मॅन आश्पाक पटेल यांच्या ब्रँडची मोठी चर्चा

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

संविधानिक प्रक्रियेतील लोकशाहीच्या उत्सवात आपल्या गाव ,शहराला नेतृत्व देऊन विकासाच्या दिशेला मार्गस्थ होण्यासाठी यंदा नगराध्यक्ष म्हणून वेगळीच चुरस निर्माण झाली आहे .धर्मनिरपेक्ष या शहरात एकता ,अखंडता पाळत खोपोलीकरांनी आपल्या शहराची एक वेगळी ओळख अनेक वर्षापासून टिकवलेली आहे . यावेळी हि आजी माजी विविध पक्षातील नेत्यांनी ,अनुभवी लोकप्रतिनिधींनी यंदाही खोपोली शहराचे नेतृत्व करण्यासाठी आपली इच्छा व्यक्त केली आहे .एके काळी महसुलीत अव्वल दर्जा असलेली अनेक जागतिक दर्जाच्या उद्योग समूहांना सोयी सुविधा उपलब्ध करून आकर्षित करणारी पालिकेला सोन्याचा धूर काढणारी श्रीमंत नगरपालिका म्हणून ओळखले जात होते. मात्र आता पालिकेच्या त्या वैभववाला टिकून ठेवण्यासाठी आजपर्यंत अनेक वर्ष सत्ता टिकवणारे सत्ताधारी व अनभिज्ञ मतदार यशस्वी ठरू शकले नाही .यंदा हि महसुली तुटवडा कारण पुढे येत पुढील अनेक विकासाच्या दृष्टीने निधीच्या कमतरतेमुळे विकास थांबला असल्याचे कारण ऐकायला मिळत असते . याच कारणामुळे कदाचित खोपोलीकरांनी यंदा



सत्तेतील घटक पक्षांना सोबत घेऊन नगर परिषदेला मोठ्या स्वरूपात निधी उपलब्ध होत रहावा यासाठी काही वेगळी खेळी खेळण्याची मानसिकता दर्शविली आहे.

, मात्र यामध्ये काही नवीन युवा उमेदवारांनी थेट नगराध्यक्ष पदासाठी आपली इच्छा व्यक्त केल्याने एक मोठा फटका युती धर्मातील उमेदवारांना मिळण्याची दाट शक्यता दर्शविली जात आहे . यामध्ये उद्योजक अल्पसंख्याक नेते अशपाक भाई पटेल यांचे नाव अग्रेसर असून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या युवा नेतृत्वाकडे शहरातील मोठा घटक वर्ग आकर्षिला जात आहेत , याला कारण त्यांची शिव प्रेरणेतून कार्य करण्याची स्वराज्य पध्दती आहे .समाजाप्रती संवेदनशील पणे बांधिलकी जपत सर्वधर्माच्या घटकांच्या लोकांना सोबत घेत शहरासाठी काही विशेष करावे, आधुनिक शहराला निर्माण करताना शिक्षण, रोजगार ,आरोग्य या मूलभूत सुविधांच्या पुढे जाऊन आधुनिक शहराच्या नियोजनासाठी विविध क्षेत्रातील तज्ञ युवक युवतींना सोबत घेत त्यांच्या उच्च शिक्षणाच्या जोरावर नवनिर्माण करताना संशोधनाच्या कृतीतुंन नवीन शहराचे शिल्पकार बनविण्यासाठी एक नवीन अध्याय पुढच्या पिढीसाठी समोर ठेवण्याचे ध्येय अशपक भाई मित्र परिवाराच्यावतीने केला जात आहे . सध्या शर्यतीत पारडा जड असलेले अनेक सत्तेतील राजकीय पक्ष व त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून विरोधी गटातील महाविकास आघाडीतील अनेक आव्हान जरी प्रमुख चर्चेचे विषय बनले गेले . परंतु स्वतंत्र पक्ष लढल्यास विविध प्रकारे घोडेबाजार होण्याची चित्र निर्माण झाली आहे आणि यामुळे नव तरुणांकडे खोपोलीकरांचे लक्ष वेधले आहे .अल्पसंख्यांक समाजातील हा चेहरा बहुजनांचा नेता म्हणून खोपोलीकरांसाठी एक पर्याय म्हणून खुनवत असल्याने इच्छाशक्तीच्या जोरावर यंदा एक मत शहरासाठी शहराच्या विकासासाठी असे बोधवाक्य अशपाक भाई पटेल यांच्या नेतृत्वातून समोर येत आहे.काटरंग, क्रांतीनगर, वासरंग, हाळ ,पटेल नगर ,यशवंत नगर येथील अल्पसंख्यांक समाजातील हजारो मतदार त्यांच्या संपर्कात असून त्यांच्या मताधिक्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असल्याने युती मधील अनेक पक्षांचे अश्फाक भाई पटेल यांच्या प्रत्येक हालचालींवर लक्ष लागलेले आहे. राजकारण उपजीविकेसाठी नसून समाजाचे काही देणे असावे आणि त्यातून आयुष्यातून प्रवास करताना अविस्मरणीय अशा कार्यातून अनंतकाळ स्वतःला जिवंत ठेवण्यासाठी असलेली मनाची ही इच्छा अशपाक भाई पटेल यांनी प्रसार माध्यमातून व्यक्त केली. संघर्षाला लढा देत शून्यातून विश्वास निर्माण करणाऱ्या अशपाक भाई यांना दर्शक बनण्यापेक्षा स्वतः कार्यकृतीतून क्रांती करण्याची इच्छा दाट असल्याने या युवा वादळाला रोखण्यासाठी पुढील राजकीय गणित त्यांच्यापुढे कसे आव्हान देतील याकडे त्यांच्या पाठीमागे असलेल्या त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या अनेक शुभचिंतक कार्यकर्त्यांनी आपले देव पाण्यात ठेवले आहे आणि आपकी बार सर्वसामान्य जनतेचा होकार हे ऐकण्यासाठी अशपाक भाई पटेल यांनी जनता जनार्दन खोपोलीकरांच्या सकारात्मक प्रतिसादासाठी आपल्या जनसेवा कार्यालयात आपल्या सूचना मार्गदर्शनासाठी आमंत्रित हे केले असल्याचे समजले जात आहे.

खोपोलीकर यंदा सर्वसामान्य जनतेच्या रूपातील अश्फाक भाई पटेल यांना कसले संकेत देतील हे पुढील काळात समोर येईलच पण कॉमन मॅन म्हणून त्यांनी मिळवलेली लोकप्रियता ही कमालीची चर्चेत असल्याने CM म्हणून कॉमन मॅन म्हणून युवा वर्ग त्यांना प्रसारमाध्यमातून # tag करत आहे.

## अलिबाग-रोहा मार्गावरील वढाव-खानाव साकव कोसळला गलथान पद्धतीने काम करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचा 'ठेका-तोड' कारभार उघड!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

अलिबाग तालुक्यातील अलिबाग-रोहा मार्गावर वढाव ते खानाव दरम्यानचा साकव सोमवारी (दि. ३) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास कोसळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या साकवाचा कोसळलेला भाग म्हणजे केवळ बांधकामातील निष्काळजी पणाचं नव्हे, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बेफिकीर आणि भ्रष्ट कारभाराचं जिवंत उदाहरण आहे. या दुर्घटनेमुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून, दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. रोजचा प्रवास करणाऱ्या नागरिकांना आणि शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतोय. पावसाळा संपूनही साकवाच्या दुरुस्तीचं काम सुरू न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.अपघाताच्या वेळी एक दुचाकी साकवावरून जात असताना सुदैवाने चालक थोडक्यात बचावला, तर दुसऱ्या



एका वाहनचालकाला किरकोळ दुखापत झाल्याची माहिती आहे. जीव वाचले हे नशीब, पण शासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिक जीव मुठीत धरून जगत आहेत, हे तितकंच भयावह वास्तव आहे.स्थानिक प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असले, तरी केवळ घटनास्थळी भेटी देऊन फोटोसेशन केल्याने प्रश्न सुटणार नाही. जनतेच्या संयमाची परीक्षा घेणाऱ्या या विभागावर आता कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.हा साकव केवळ कोसळलेला पूल नाही तो शासनाच्या दुर्लक्षाचा, भ्रष्ट ठेकेदार-प्रशासकीय संगनमताचा आणि नागरिकांवरील अन्यायाचा 'पुरावा' आहे.

# सोयगाव नगर पंचायतीत 'काळा बाहुलीचा' थरार....... शहरात भीतीचा आणि चर्चेचा माहोल!

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव :** नगर पंचायतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ सोमवारी दुपारी अचानक सापडलेली टाचण्या टोचलेली काळी बाहुली सध्या शहरात मोठी चर्चा आणि संभ्रमाचे कारण ठरत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या कामादरम्यान ही बाहुली जमिनीत गाडलेली अवस्थेत सापडली. कर्मचाऱ्यांना ती दिसताच त्यांनी खोदकाम तातडीने थांबविले.या घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांमध्ये एकच प्रश्न — ही काळी बाहुली कोणी आणि का पुरली? काहींनी हा प्रकार जादूटोण्याशी संबंधित असू शकतो असा अंदाज व्यक्त केला, तर काहींनी याला खोडसाळपणा ठरवले.

घटनेची माहिती मिळताच नगरसेवक बंटी काळे, गजानन कुडके,राजू दुतोंडे, संतोष बोडखे तसेच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे, यांनी घटनास्थळ गाठून पाहणी केली.

प्रा.शिवाजी वाठोरे यांनी सांगितले,"अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे असे प्रकार सुशिक्षित




समाजासाठी लज्जास्पद आहेत. जादूटोणा ही फक्त भीती पसरवण्याची पद्धत आहे, त्यात कोणताही वास्तव नाही. पोलिसांनी या घटनेचा सखोल तपास करावा."

नगरसेवक राजू दुतोंडे यांनी म्हटले,"हा प्रकार नागरिकांना घाबरविण्यासाठी कोणी मुद्दाम केला असावा. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, प्रशासन तपास करत आहे."नगरपंचायतीने या घटनेचा तपास सुरू केल्याचे आश्वासन दिले असून नागरिकांना शांतता व संयम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सोयगावसारख्या प्रगत होत असलेल्या शहरात अंधश्रद्धेचे सावट पुन्हा एकदा दिसून येणे हे निश्चितच चिंताजनक आहे. या घटनेमुळे प्रशासनासह सर्वसामान्य नागरिकांमध्येही जागरूकतेचा संदेश देणारी चर्चा सुरू झाली आहे.

**प्रतिक्रिया –योगेश पाटील (सामाजिक कार्यकर्ते):**

"आजही आपल्या समाजात अंधश्रद्धा मुरलेली आहे, पण जागरूक नागरिकांनी अशा प्रकारांना विरोध करणे गरजेचे आहे."

–बटींभाऊ काळे नगरसेवक:

"अशा घटना शहराची प्रतिमा खराब करतात. पोलिसांनी दोषींना शोधून कडक कारवाई करावी.""सोयगावच्या नगरपंचायतीसमोर सापडली 'काळी बाहुली';अंधश्रद्धेच्या अंधारात शहरात भीतीची सावली!"

# उरण मधील नागरिक वातावरणातील बदलांमुळे विविध आजारांनी ग्रस्त

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/प्रतिनिधी**

वातावरणातील बदलामुळे मानवी जीवनावर अनेक प्रकारे परिणाम होत असतो, आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. कधी ऊन, कधी पाऊस तर कधी थंडी याचा परिणाम मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर होतो तसेच शेती पर्यावरण आणि दैनंदिन जीवनावरही याचा परिणाम होतो. हवामानातील या सततच्या बदलामुळे अस्वस्थता वाढते. अचानक बदलणाऱ्या वातावरणामुळे शरीर आणि मन अस्वस्थ होऊ शकते .सकाळी घाम येणे ,दुपारी तीव्र ऊन, संध्याकाळी अचानक पाऊस ,थंड वारा असं वातावरण अनुभवायला मिळत आहे ,या सततच्या बदलामुळे सर्दी, खोकला यासारखे आजार होऊ शकतात.

संपूर्ण महाराष्ट्रात यंदा आपण एक विचित्र ऋतू अनुभवत आहोत दुपारी उकाडा दुपारनंतर जोरदार पाऊस आणि संध्याकाळी गारवा एकाच दिवशी तीन ऋतूंचा अनुभव ऊन, पाऊस आणि थंडी जणू निसर्गाने स्वतःचे नियम बदलले आहेत पण या बदलाचा परिणाम मानवी जीवनावर खोलपर्यंत होत असतो. हा सतत बदलणारा वातावरणीय अनुभव आपल्या मेंदूला स्थिरता मिळू देत नाही. अशा परिस्थितीत शरीराला तापमानाशी जुळवून घ्यावे लागते आणि मेंदूला सतत अलर्ट मोड मध्ये राहावे लागते. त्यामुळे आपल्याला अस्वस्थता चिडचिड थकवा आणि एकाग्रतेचा अभाव अशी लक्षणे जाणवतात.

कधी ऊन कधी पाऊस तर कधी थंडी हा झाला वातावरणातील बदल पण उरणच्या प्रदूषणात मात्र मानवनिर्मित कंपन्या ,लाखो वाहनांचा धूर,कंपन्यातून निघालेल्या विषारी वायू त्यामुळे सतत उरण मध्ये ताप, सर्दी, खोकला



या संसर्गजन्य आजारांची वाढ होत आहे. त्याचप्रमाणे अशा या अस्वस्थ हवामानामुळे हृदयासंबंधीचे विकारही बळवले आहेत.

त्यात उरण मध्ये अध्यायवत हॉस्पिटल उपलब्ध नसल्याने वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेक रुग्ण दगावत आहेत.

सर्वसाधारण आर्थिक परिस्थिती असलेला नागरिक शासकीय रुग्णालयात उपचार घेत आहेत तर काही रुग्ण खाजगी रुग्णालयाचा आधार घेऊन आपल्या आजारांवर उपचार करून घेण्यासाठी रुग्णालयात रांगाच रांगा लागत आहेत. वातावरणातील सततच्या बदलामुळे आणि त्यात भर घालत आहेत उरण मधील असणाऱ्या केमिकल प्रकल्प, गोदाम, भंगाराचे दुकाने त्यातून निघणारे विषारी वायू वातावरणात जाळले जात आहेत, तसेच तालुक्यात अनेक ठिकाणी विकासकामे चालू आहेत त्यातूनही निघालेली धूळ, दिवसभरात लाखो अवजड वाहनांची वर्दळ, विषारी वायू या सर्व गोष्टींमुळे उरणच्या वातावरणात प्रदूषणाचे प्रमाण अतिशय वाढले आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील नागरिकांत श्वसनाच्या विकारातही वाढ होत आहे.

ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच खाजगी रुग्णालयात रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

उरण च्या इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात दिवसागणित वेगवेगळ्या आजारांचे २५० ते ३००रुग्ण उपचार घेत आहेत, त्यातील काही रुग्ण ऍडमिट होऊन उपचार घेत आहेत. कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र जवळपास शंभर ते सव्वाशे रुग्ण उपचार घेत आहेत.

वाढत्या आजारांवर नियंत्रण आणण्यासाठी उरण तालुक्यातील प्रदूषणावरती नियंत्रण आणण्याची आज गरज भासू लागली आहे.

नाहीतर भविष्यात या वाढत्या प्रदूषणामुळे साथीचे आजार, संसर्गजन्य आजार, हृदयविकारांचे आजार, श्वसनाचे आजार मोठ्या संख्येने वाढून मृत्यूच्या संख्येत वाढ होईल. अशी शंका नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## अनाथाश्रमातील लहान मुलांना कपडे, खाऊ, धान्य वाटप



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**


नोव्हेंबर रोजी खारघर येथील गिरीजा फाऊंडेशनच्या अनाथाश्रमातील लहान मुलांना रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या वतीने कपडे, खाऊ, मैदानी व बैठे खेळाचे साहित्य, आश्रमासाठी गृहोपयोगी वस्तू, धान्य देण्याचा महत्वाचा उपक्रम राबविण्यात आला.

कपडे ,खेळाचे साहित्य आश्रमातील अनाथ मुलांना मिळाल्या नंतर त्यांचा चेहऱ्यावरील उमटलेले हसू आणि आनंद बघण्यासारखा होता. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष रो. अनिल ठकेकर, सचिव अतिष थोरात, प्रोजेक्ट चेअरमन अश्विनी जोशी, डॉ .तुषार जोशी, विकेश कंडपीळे, विशाल रणदिवे, सारिका ठकेकर, पूजा थोरात, ज्योती गडगे उपस्थित होत्या.

## अल्पवयीन तरुणीचे अपहरण

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

रहाते घरातुन कोणीतरी अज्ञात इसमाने काहीतरी आमीष दाखवून एका अल्पवयीन तरुणीला तिच्या कुटुंबियांच्या कायदेशीर रखवालीतून त्यांचे संमतीशिवाय पळवून नेला आहे. याबाबत उलवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे .



अपहृत मुलगी नामे गौतमी रमाकांत वाघमारे वय 16 वर्षे हीस रा. रु.नं. 404, दुर्वांकुर अपार्टमें, प्लॉ नं. 203, सेक्टर 03, उलवा ता. पनवेल येथून तिच्या कुटुंबियांच्या कायदेशीर रखवालीतून त्यांचे संमतीशिवाय पळवून नेण्यात आले आहे . उंची सुमारे 05 फुट अंदाजे, अंगाने सडपातळ, रंगाने गोरा, चेहरा- उभट, नाक सरळ, डोक्याचे केस लांब मोकळे, अंगात जिन्स पँट व टिशर्ट परंतु नक्की रंग माहीती नाही., कानात छोटे मणी असलेले फुल, नाकात फुली, तिला मराठी, हिंदी भाषा अवगत , सोबत VIVO कंपनीचा मोबाईल आहे . याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने उलवा पोलीस ठाणे पोलीस उपनिरीक्षक अनिल राजुरे यांच्याशी संपर्क साधावा .

## लोखंडी रॉडने मारहाण केल्या प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

महानगरपालिकेत अर्ज करून गॅरेज समोरील शेड तोडेल आणि गॅरेज बंद पाडेन असे बोलून लोखंडी रॉडने मारहाण केल्या प्रकरणी तिघांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खालीद खान राहणार फेस 1, तळोजा हे त्यांचा मोठा भाऊ आणि काम करणारा मुलगा यांच्यासह तळोजा, सेक्टर 2 येथील जारा ऑटो पार्ट्स या गॅरेजवर होते. यावेळी शादाब बेग व त्याचे मित्र सोहेल आणि नदीम अन्सारी यांनी तेथे येऊन धमकी दिली. आणि मोटरसायकलचे काम फ्री मध्ये करून देण्यास आणि प्रत्येक महिन्याला पाच हजार रुपये हप्ता म्हणून देण्यात सांगितले. हप्ता दिला नाही तर महानगरपालिकेत अर्ज करून गॅरेज समोरील शेड तोडेल आणि हातपाय तोडून येथून हिसकावून लावेल अशी धमकी दिली. त्याला नकार दिला असता शादाब बेग, सोहेल आणि नदीम अंसारी यांनी शिवीगाळ करून खालिद याला लोखंडी रॉडने मारहाण केली.

## दोन ठिकाणी घरफोडी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

एकाच रात्री पुष्पक नगर, वरचा ओवळा या ठिकाणी चोरट्यांनी दोन घरफोड्या करत लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 30 ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अंबादास उंबरे हे श्री गणेश सोसायटी सेक्टर एक, पुष्पकनगर, वरचा ओवळा येथे राहत असून ते रात्री जेवण करून झोपले होते. 30 ऑक्टोबर रोजी यांची पत्नी झोपेतून उठली असता घरातील सामान अस्ताव्यस्त व कपाट उघडे दिसले. त्यांनी पाहणी केली असता सोन्याचा नेकलेस, लहान पोत, सोन्याचे टॉप, अंगठी, रोख रक्कम, मोबाईल असा एकूण पाच लाख 76 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला. त्यांच्या शेजारील सोसायटीत राहणारे संजय झुगे (जेके प्राइड सोसायटी) यांच्या घरातून रोख रक्कम आणि मोबाईल चोरून नेला.

## करंजाडेत डेब्रीज टाकण्यासाठी आलेल्या डंपर्सवर कारवाई दोन डंपर्स जप्त; चालकांविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**

सिडकोने संपादित केलेल्या जमिनींवर तसेच संपादिक करण्यात येत असलेल्या भूखंडावर बेकायदा डेब्रिज टाकणाऱ्या डंपर बरोबर त्यांच्या चालकांना रंगेहाथ पकडून या प्रकारांना आळा घालण्यासाठी सिडको प्रशासनाने कंबर कसली आहे. त्याचाच एक भाग म्हणून सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने नुकतीच करंजाडे नोड से-३ करंजाडे येथे सिडकोच्या कार्यक्षेत्रात डेब्रीज खाली करणाऱ्या दोन डंपर्सवर कारवाई करून ते जप्त करण्यासह चालकांविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मुंबईतील राडा रोडा नवी मुंबई परिसरात दिवसा तसेच रात्रीच्या अंधारात गुपचूपपणे टाकण्याचे प्रकार वाढले आहेत. अशाच प्रकारे राडा रोडा घेऊन एक डंपर करंजाडे नोड से-३ येथे येत असल्याची माहिती सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग,

करंजाडेत डेब्रीज टाकण्यासाठी आलेल्या एमएच-४६- बीयू-७४९४ व डंपर क्रमांक एमएच-४६-बीएम-०३१३ वरील चालक हे त्यांच्या ताब्यातील डंपर मधून मानवी जिवितास व लोकांच्या आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रीज हे अनधिकृतपणे आणून करंजाडे नोड से-३ याठिकाणी सिडको कार्यक्षेत्रात खाली करत असतांना मिळून आले. यावेळी भरारी पथकाने दोन्ही डंपर जप्त केले असून याबाबत चालक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## मुल्हेर येथे श्री उद्धव महाराज पुण्यतिथी निमित्त भव्य कुस्त्यांची दंगल आयोजित....

**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी: दीपक गायकवाड**

बागलाण तालुक्यातील पश्चिम भागातील आदिवासी भागातील मुल्हेर हे बाजारपेठेचे मध्यवर्ती ठिकाण आहे. मंगळवार रोजी 40 खेड्यांच्या कुस्ती पटूंनी कुस्तीना हजेरी लावली. कुस्तीसाठी गाव वर्गणी करून पैसा जमा करण्यात आला. अनेक कुस्तीपटूंनी कुस्तीचा मनसोक्त आनंद या कुस्ती दंगल मधून घेतला. यात कुस्त्यांची देण म्हणून गुंडा, पातेल, कढाई, पाणीचा टीप, तांबे, गल्लास व रोख रक्कम स्वरूपात बक्षीस देण्यात आलेत. अनेक पहिलवानांनी डावपेच आखत मातब्बर पैलवानांना धूळ चारली. यात दीपक संतोष शेलार अंबासन यांनी मानाच्या कुस्तीचा मान मिळवला रोख रक्कम बाराशे व पाण्याचा टीप बक्षीस , फेटा बांधून मान मिळवला व कुस्ती जिंकली .

१. अनिल पंडित पवार लखमापूर व प्रवीण तेजा देसाई कुडाशी (वाकी) ही कुस्ती दोघं पैलवान सारखे डावपेचा कर शेवटी पंचांना रद्दबादल ठरवावी



लागली. त्यामुळे अनेक कुस्तीपटूंना काही अंशी हिर मोड झाला.

हे वघळता आता बाकीच्या कुस्त्या मनमोहक ठरल्या. यात सटाणा येथील कुमारी शुभांगी हिने कुस्तीची जय्यत दंगल मुलांबरोबर खेळून बक्षीस मिळवले हे वैशिष्ट्य मुल्हेर दंगलचे ठरले. यात पंच म्हणून बळवंत गायकवाड, तुळशीराम जगताप, बापू कुटे, सुरेश बत्तीसे, चंद्रकांत खरे, गणपत भाऊ बर्डे, उद्धव अहिरे, माजी पीएसआय साबळे, बन्सीलाल बत्तीस, तूषार तिवारी, शेखर पंडित, तंटामुक्ती अध्यक्ष सुनील गर्गे, सरपंच निंबा भाणसे, सागर भाणसे व मुल्हेर पोलीस स्टेशनचे हवालदार शरद भगरे आणि योगेश साळुंखे यांनी काम बघितले.

## सौ माधुरी सागर भिसे यांच्या उमेदवारीमुळे अजित पवार गटाचा होणार हक्काचा जि.प. सदस्य

### सणसर-लासुर्णे गटातील मतदारांची उमेदवारीस वाढती लोकप्रियता

**दैनिक युवक आधार**
**सणसर : विकास क्षत्रिय**

सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गट हा राजकीय दृष्टीने तालुक्यातील महत्वाचा असून या गटात आजपर्यंत विद्यमान आमदार व कृषीमंत्री दत्तात्रय मामा भरणे यांना हा गट ताब्यात घेता आला नसून जिल्हा परिषदेच्या सौ.माधुरी सागर भिसे व लासुर्णे पंचायत समितीसाठी श्री सागर बाळासाहेब भिसे यांना उमेदवारी दिली तर त्यांना या गटात नक्कीच बदल येणार असल्याची माहिती एका राष्ट्रीय मोठ्या राजकीय पक्षाने केलेल्या सर्वेक्षणात दिसून आले असल्यामुळे भिसे यांची उमेदवारी फायदयाची ठरू



शकते.

सणसर- लासुर्णे जिल्हा परिषद गटामध्ये जिल्हा परिषदेच्या उमेदवारीसाठी सौ.माधुरी सागर भिसे व लासुर्णे पंचायत समितीसाठी श्री सागर बाळासाहेब भिसे हे इच्छुक असून ते जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती या दोन्हींपैकी एका ठिकाणी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत.दत्तात्रय मामा भरणे व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात त्यांची एकनिष्ठाता सर्वसामान्य लोकांना असणारी मदत युवकांना उपलब्ध करून दिलेला रोजगार यामुळे सागर भिसे यांच्या उमेदवारीचे पारडे जड असल्याचे सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील मतदार व युवकांमध्ये जोराची चर्चा सुरु आहे जिल्हा परिषद गटातील युवकवर्ग यांनी सांगितले सागर भिसे यांच्या संघटन कौश्यल्यामुळे त्यांच्यासोबत फार मोठे युवकांचा मित्रपरिवार नातेसंबंध यांचा सुद्धा मोठा परिवार आहे याचा फायदा राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटास या निवडणुकीत नक्कीच होणार असल्याची चर्चा गावागावात सुरु आहे.

## मारहाण करून गाडीचे केले नुकसान

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

लाथाबुक्यांनी मारहाण करून गाडीची तोडफोड केल्याप्रकरणी चौघाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात एक नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.लतीफ शेख हा वाावेघर येथे राहत असून त्यांनी 31 ऑक्टोबर रोजी रात्री अकराच्या सुमारास नांदगाव येथील समीर भंगारवाला याच्या दुकानात त्याचा मुलगा रेहान याला मोबाईलवर कॉल करून त्याची हालचाल विचारली. यावेळी त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. त्यांनतर लतीफचा भाऊ अली याला परत कामावर घेता का असे विचारण्यास नांदगाव येथील भंगाराच्या दुकानात गेले असता समीरचा मुलगा रेहानने लोखंडी रोडने डोक्याच्या पाठीमागे मारून लतीफ याला जखमी गेले. रेहान याचा मित्र याने देखील लोखंडी पंचने पोटावर, पाठीवर मारले. यावेळी लतीफचा मित्र आयुब शेख याला देखील हत्याराने मारून जखमी केले. त्यानंतर त्यांच्या एका मित्राने व समीर याने शिवीगाळ करून लाथा बुकयांनी मारहाण केली तसेच सेलेरिओ गाडीचे तोडफोड करून नुकसान केली. या प्रकरणी चौघाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ग्रामविकास अधिकाऱ्यांचे केबिन नजरेआड; गावकऱ्यांचा सवाल – "अरे अधिकारी आहेत तरी का नाहीत?"

**दैनिक युवक आधार**
**लातूर/मोहम्मद पिंजारी**

मुरुड ग्रामपंचायतीत ग्रामविकास अधिकाऱ्यांचं केबिन इतकं आतल्या बाजूला ठेवलेलं आहे की, बाहेरून येणाऱ्याला तर दरवाजा कुठं आहे हेही समजत नाही. गावातले नागरिक, म्हातारे लोक, महीला, शेतकरी आपापल्या कामासाठी पंचायत मध्ये येतात, पण अधिकारी कुठं आहेत केबिन कुठं आहे, हे शोधता शोधता त्यांचा धीरच संपतो

काही गावकऱ्यांचं म्हणणं आहे की, कर्मचाऱ्यांना विचारलं तर उडवा-उडवीची उत्तरं दिली जातात. "साहेब आत नाहीत" असं सांगितलं जातं, आणि मग काही वेळानं लक्षात येतं की साहेब तर आतच होते! "गावाच्या




विकासाचं काम बघणारे अधिकारीच नजरेला पडत नाहीत, मग विकास कुठून होणार?" असं म्हणत नागरिक संताप व्यक्त करतायत

केबिन इतकं मागच्या बाजूला आहे की बाहेर ना नावफलक, ना काही सूचना. लोक गोंधळून जातात आणि काम सोडून परत जातात. "ग्रामपंचायत ही लोकांसाठी असते, पण इथं तर लोकच हरवतात!" असा टोला काही नागरिक लगावतात

गावकऱ्यांची आता ठाम मागणी आहे अधिकारी लोकांसाठी सहज उपलब्ध व्हायला हवेत, केबिनचं ठिकाण बदलावं किंवा तरी बाहेर मोठा फलक लावावा. "गावाच्या विकासाचं प्रशासन या छोट्याशा पण मोठ्या प्रश्नाकडे लक्ष देईल का?" असा भावनिक सवाल आता प्रत्येक ग्रामस्थ विचारतोय.

## युवांसाठी प्रेरणादाई असलेल्या श्रीमती आयएएस त्रुप्ती धोडमिसे 'युथ आयकॉन अवॉर्ड २०२५' ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

सिंधुदुर्गनगरी येथे आयोजित कार्यक्रमात कोकण एनजीओ इंडिया तर्फे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आयएएस श्रीमती तृप्ती धोडमिसे यांना प्रतिष्ठेचा 'युथ आयकॉन अवॉर्ड २०२५' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार पद्मश्री परशुराम गंगावणे आणि कोकण एनजीओ इंडियाचे अध्यक्ष दयानंद कुबल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला व्यवस्थापक प्रथमेश सावंत, देवानंद कुबल, गौरी अडेलकर, समीर शिर्के, वैष्णवी म्हाडगूत, शशिकांत कसले, अवंती गवस, रुचा पेडणेकर, अमोल गुरम आणि पद्माकर शेटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भावना व्यक्त करताना आयएएस तृप्ती धोडमिसे म्हणाल्या,"कोकण संस्थेचा 'युथ आयकॉन अवॉर्ड २०२५' हा सन्मान मिळणं माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि भावनिक बाब आहे. माझ्या प्रवासात आलेल्या संघर्षांना आणि प्रत्येक टप्प्यावर दिलेल्या



परीक्षांना या पुरस्काराच्या रूपाने मिळालेली दाद, ही माझ्या केवळ वैयक्तिक नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या प्रेरणेची कहाणी आहे."त्या पुढे म्हणाल्या,"मी चौथ्या प्रयत्नात आयएएस झाले, पण त्या मागे असंख्य अपयश, निराशा, आत्मपरीक्षण आणि न थांबता चालणारी मेहनत होती. आजच्या तरुणांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी – अपयश हे यशाचं पहिले पाऊल आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, तुमचं ध्येय ठरवा आणि त्यासाठी झपाटून काम करा. पेटून उठा, ध्येय गाठल्याशिवाय थांबू नका."

या सन्मानाबद्दल पद्मश्री परशुराम गंगावणे यांनी त्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, तृप्ती धोडमिसे यांचा प्रवास हा सर्व युवकांसाठी प्रेरणादायी आहे.

विशेषतः जे विद्यार्थी एमपीएससी आणि युपीएससी परीक्षांची तयारी करत आहेत, त्यांच्यासाठी त्यांची वाटचाल ही एक उज्ज्वल आदर्श ठरेल.

श्रीमती तृप्ती धोडमिसे यांनी या प्रसंगी कोकण एनजीओ इंडिया संस्था गेल्या १४ वर्षांपासून समाजाच्या उन्नतीसाठी करत असलेल्या कार्याचं विशेष कौतुक केलं आणि या कार्यात सातत्य राहो, अशी सदिच्छा व्यक्त केली.

## कोकण रत्न २०२५ पुरस्काराने उद्योजक प्रशांत यादव व अभिनेते अविनाश नारकर सन्मानित




**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

कोकण कला व शिक्षण विकास संस्था आयोजित 'कोकण कला महोत्सव २०२५' हा भव्य कार्यक्रम संस्थेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त साजरा करण्यात आला. हा महोत्सव मुंबईतील दादर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात पारंपरिक नृत्य, रॅम्प वॉक, विविध कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.आपली माती, आपली माणसं आणि आपली संस्कृती" ही त्रिसूत्री केंद्रस्थानी ठेवून कोकणाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले सहकार महर्षी ज्यांनी कोकणात सहकार आणि स्वयंरोजगार - रोजगार क्षेत्रात भरीव कार्य करणारे 'वाशिष्ठी मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स प्रा. लि.' चे अध्यक्ष व संस्थापक मा. श्री. प्रशांत बबन यादव, तसेच मराठी रंगभूमी, चित्रपट सृष्टीत क्षेत्रात अनेक दशकांपासून आपल्या प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे बहुआयामी अभिनेते अविनाश नारकर ज्यांनी नैसर्गिक अभिनयशैली आणि दमदार व्यक्तिमत्वामुळे स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. यांना यावर्षीच्या 'कोकण रत्न २०२५' या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार पद्मश्री मुरलीकांत पेटकर (चंदू चॅम्पियन) आणि कोकण संस्थेचे अध्यक्ष श्री. दयानंद कुबल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला, यावेळी मंचावर आनंद फाउंडेशनच्या अध्यक्ष अपूर्वा वैद्य, लेखक - दिग्दर्शक श्रीनिवास नार्वेकर, सिंधुदुर्ग सहकारी बँक मुंबईचे सचिव दिनकर तावडे, जीवन आनंद चे अध्यक्ष संदीप परब, संस्कार क्लासेसचे अध्यक्ष रमेश राणे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच समाज माध्यमांवर प्रभावीपणे कार्य करणाऱ्या मंगेश काकड, आरती जळगावकर, आदिराज सिद्धेश्वर घनघाव आणि युवराज दिंगबर घनघाव, प्रोफेसर संजय अप्पन, वीरू महादेव वज्रवाद आदी कंटेंट क्रिएटर्ससाठी - रील टू रियल पुरस्कार देण्यात आला. , ग्रामीण भागातील महिलांसाठी- झिरो टू हिरो पुरस्कार, युवा उद्योजकांसाठी- युथ आयकॉन पुरस्कार, शिक्षण स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धनात आदर्श असणाऱ्या गावाला- आदर्श गाव पुरस्कार, निःस्वार्थ भावनेने दीर्घकाळ समाजकार्यात कार्यरत असलेले व्यक्तिमत्त्वांना समाज गौरव पुरस्कार, आपल्या कामातून, विचारातून किंवा सर्जनशीलतेतून समाजाला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तींचा गौरव यू इन्स्पायर पुरस्कार, अशा विशेष पुरस्कारांनी कलाकार आणि विशेष व्यक्तिमत्त्वांचा सन्मान या महोत्सवात करण्यात आला.या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली, चिपळूण सहकारी बँकेच्या अध्यक्षा स्वप्नाजी यादव , मराठी अभिनेता शंतनू रांगणेकर, भारतीय सैन्यातील निवृत्त मेजर आर्चिस सबनीस, विंग कमांडर - वैष्णवी टोकेकर, कन्टेन्ट क्रियेटर सार्थक सावंत, साहिल दळवी, जनजागृती फाउंडेशनचे संस्थापक शरदचंद्र आढाव, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत सुवर्णा उपस्थित होते. तसेच संस्थेचे व्यवस्थापक आणि कोकण संस्थेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनेते अक्षय ओवळे आणि कोमल डांगे यांनी केले, तर आभारप्रदर्शन संस्थाध्यक्ष दयानंद कुबल यांनी मानले.

# सक्षम परिवहन व्यवस्था, ग्रामीण भागातील शिक्षण व आरोग्य सुविधा आणि पायाभूत विकासाची उपलब्धी नागपूरच्या विकासाची असेल त्रिसूत्री - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

**नागपूर :** सुमारे २० वर्षांपेक्षा अधिक काळापासून नागपूर महानगराच्या भविष्यातील गरजा ओळखून वेळोवेळी जे नियोजन केले, त्याचा सातत्यपूर्ण पाठपुरावा करून विकासकामे करून घेतली त्यामुळे आजच्या घडीला नागपूर महानगर हे जागतिक नकाशावर विकासासाठी ओळखले गेले आहे. यापुढेही नागपूरच्या वाढत्या विस्ताराबरोबर येथील रोजगार निर्मिती, पायाभूत सुविधा, सक्षम परिवहन यंत्रणा, जिल्ह्यातील ग्रामीण भागासाठी गुणवत्तापूर्ण शैक्षणिक व आरोग्याच्या सुविधा यावर प्राधान्याने भर देऊन विकासाचा एक आदर्श मापदंड निर्माण करू, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नागपूर जिल्ह्यातील विविध विकासकामांची माहिति सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावी यादृष्टीने येथील जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त अभिजित चौधरी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सभापती संजय मीणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी उपस्थित होते.

**परिवहन सुविधेचे सक्षम जाळे उभारणार**

नागपूरच्या विस्तारात सक्षम परिवहन सुविधेची आवश्यकता महत्वाची आहे. नागपूर महानगरासह जवळील भागात असलेल्या ग्रामीण भागातून हजारो लोक रोजगार व नोकरीनिमित्त मिहान, हिंगणा एमआयडीसी, कोराडी, वाडी, कळमना मार्केट, बुटीबोरी व अन्य भागात दररोज करतात. भविष्यातील प्रवाशांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक नागरिकाला उत्तम गुणवत्तेच्या सुविधा मिळाव्यात यासाठी नागपूर महानगरपालिका, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मेट्रो आणि एसटी महामंडळामार्फत एक अभ्यासपूर्ण वाहतूक आराखडा तयार करण्यात आला आहे. यातील महत्वाच्या बाबी लक्षात घेऊन नागपूरच्या २० किलोमीटर परिघात महागनरपालिकेचा परिवहन विभाग तर नागपूर विकास प्राधिकरणामार्फत त्यांच्या हद्दीत असलेल्या सुमारे ६५० गावांसाठी इलेक्ट्रीक बस सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. नागपूर महानगर अंतर्गत परिवहन सुविधेसाठी मेट्रोची उत्तमरीत्या उपलब्धी असून उर्वरित भागांसाठी एसटी महामंडळाची सुविधा राहील. या चारही संस्थांचा उत्तम समन्वय साधण्यात आला असून येथील भक्कम दळणवळणाच्या सुविधाही नागरिकांना चांगला दिलासा देणा-या ठरतील, असे पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

नागपूर जिल्हा परिषदेअंतर्गत आपण सर्वांसाठी घरे या निर्णयाप्रमाणे सुमारे ७५ हजार घरांबाबतचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून ही घरे आपण गरजू पात्र व्यक्तींना उपलब्ध करून देऊ, असे ते म्हणाले.

**अशी आहे विकासकामांची दिशा**

सर्व विभागांच्या समन्वयात महसूल




विभागाचा अर्थात जिल्हाधिकारी कार्यालयाचा एक महत्वपूर्ण सहभाग असतो. नागपूरच्या विकासाबाबत शासनाने सर्वसामान्यांना डोळ्यासमोर ठेवून जे धोरणात्मक निर्णय घेतले त्यासाठी लागणा-या जमिनीच्या उपलब्धतेसह अनेक कायदेशीर बाबी मार्गी लावण्यात आल्या आहेत. यात जिल्ह्यात सुमारे एक हजार १५० किलोमीटरचे पाणंद रस्ते उपलब्ध झाले आहेत. जिल्हा नियोजन व खनिज प्रतिष्ठान यांच्यामार्फत नागपूर जिल्ह्यात एक आदर्श काम झाले आहे. पाणंद रस्त्याला आपण फ्लाय ॲशची जोड देऊन यात अधिक मजबुती साधण्याचा प्रयत्न करीत असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

गोरगरिबांना स्वतःच्या मालकीची घरे मिळावीत यासाठी नागपूर जिल्ह्यात आपण पट्टेवाटप योजनेला कालबद्ध गती दिली. यामुळेच आजवर सुमारे ३० हजारपेक्षा जास्त पट्टे गोरगरिबांना वाटप करता आले. झुडपी जंगलाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार लवकरच जिल्ह्यातील सुमारे १५ हजार हेक्टर जमीन मोकळी करण्यात येईल. यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. याचबरोबर महसूल पातळीवर सर्वसामान्यांना कार्यालयीन कामकाजासाठी ज्या सातत्याने चकरा माराव्या लागत होत्या त्या ई नझुल मार्फत कमी केल्या आहेत. लोकांना घरबसल्या या प्रक्रियेत भाग घेता येणे शक्य झाले आहे. ज्यांची कुणाची प्रकरणे आहेत ती दहा दिवसात निकाली निघण्याची सुविधा यामुळे शक्य झाल्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ग्रामीण भागाला तेवढ्याच सक्षमतेने विकासाच्या प्रवाहात येता यावे यासाठी जिल्हा परिषदेतअंतर्गत महिला सक्षमीकरण, आरोग्य, कुपोषण, पंचायत व शिक्षणावर आम्ही भर आहे. नुकतेच आम्ही जिल्ह्यातील सुमारे १६०० बचत गटांना प्रत्येकी एक लाख रुपये बीजभांडवल उपलब्ध करून दिले आहे. यातून अनेक भागात विविध लहान व्यवसायांना गती मिळेल, असा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ग्रामीण भागाला अधोरेखित करून जिल्हा परिषदेच्या कार्यालयात हेल्थ वॉर रूम कार्यान्वित करण्यात आली आहे. कोराडीसारख्या भागात अगरबत्ती व हॅन्डलुम उद्योगाचे क्लस्टर साकारले जात आहे. लहान मुलांच्या प्राथमिक शिक्षणासह आरोग्याच्या दृष्टीने अंगणवाड्या ह्या अधिक सक्षम होणे आवश्यक होते. यासाठी प्रती अंगणवाडी उपलब्ध असलेला तोकडा निधी लक्षात घेऊन त्याला आता जिल्हा वार्षिक योजनेची जोड देऊन जिल्ह्यात ४० आधुनिक अंगवाड्यांची उभारणी केली जात आहे. याव्यतिरिक्त ६० अंगणवाड्यांना एआय बेसची जोड देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी दिली.

**पायाभूत विकासासह रस्त्यावर फिरणा-या मोकाट जनावरांसाठी देशातील पहिला नंदग्राम प्रकल्प होणार साकार**

नागपूर महानगरपालिकेअंतर्गत विविध विकासकामांना गती मिळावी यासाठी शासनाने नुकताच ३१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यात पूर्व व उत्तर नागपुरातील पाणीप्रश्न मार्गी लागणार आहे. पादचारी मार्गाची सुधारणा, रॉक गार्डन, विविध ठिकाणी क्रीडांगणे, उद्यानाचे सौंदर्यीकरण, व्यायामशाळा आदी विविध विकासकामांसह भारतातील एक आदर्श प्रकल्प म्हणून ओळखला जाईल असा नंदग्राम प्रकल्प आम्ही साकारत असल्याचे महानगरपालिका आयुक्त अभिजित चौधरी यांनी सांगितले.

रस्त्यावरील मोकाट जनावरांचा प्रश्न हा अत्यंत कुशलतेने हाताळता यावा व यात मोकाट प्राण्यांना कोणतीही बाधा न पोहोचविता त्यांना एका ठिकाणी सुरक्षित ठेवता यावे यादृष्टीने पारंपारिक कोंडवाड्याला प्रगत रूप देऊन हा नंदग्राम प्रकल्प साकारत असल्याचे ते म्हणाले. यात जवळपास ३ हजार ४६० मोकाट जनावरांना जागा उपलब्ध होईल. सुमारे १२२ जनावरांचे मोठे गोठे यात असतील. वाठोडा येथे हा प्रकल्प उत्तमरीत्य साकारला जावा असे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर महानगरातील परिवहन सुविधा भक्कम करण्यासाठी २५० ई बसेस उपलब्ध आहेत. लवकरच सर्व मिळून ही संख्या ६५० पेक्षा जास्त होईल. यातून सुखकर प्रवासाची अनुभूती नागपूरकरांना घेता येणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.अमृत २ योजनेअंतर्गत पोहरा नदी प्रदूषण प्रकल्प, नाग नदी प्रदूषण निर्मूलनासाठी पुढील टप्पा, मोबीनपुरा येथे अत्याधुनिक ई लायब्ररी, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नारी येथे ५१८ सदनीकांचा प्रकल्प व सुमारे ५ हजार घरकूल साकारण्याबाबत प्रगती सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

पट्टेवाटप योजनेत नागपूर जिल्ह्यात अत्यंत व्यापक काम झाले आहे. मनपाच्या हद्दीतील व विशेषतः खाजगी जमिनीवर असलेल्या झोपडपट्टीमधील सुमारे ११० पट्टे वाटपासाठी तयार असून लवकरच त्याचे वाटप करण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.नागपूर महानगरात अनेक मजली गगनचुंबी इमारती उभारल्या जात आहेत. या इमारतीमध्ये भविष्यात आगीच्या घटना घडल्या तर त्यावर तत्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी व सुरक्षिततेसाठी सुमारे ९० मीटर उंचीपर्यंत काम करता येईल, अशाप्रकारची वाहन यंत्रणा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे सुमारे २२ अगनीशमन केंद्र नागपूर महानगरात सुरू करण्याबाबत नियोजन केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. लाड पागे समितीच्या शिफारशींना विचारात घेऊन शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सुमारे ५ हजार लोकांना याचा लाभ मिळेल, असे त्यांनी सांगून ४०० सफाई कामगारांना घरकुल योजनांची त्यांनी माहिती दिली.

**नवीन नागपूरसाठी बाह्यवळण रस्ता व चार मोठे ट्रान्सपोर्ट प्लाझा**

नवीन नागपूर साकारताना भविष्यातील गरजा व पायाभूत सुविधांचा वेध घेऊन बाह्यवळण रस्ता, चार मोठे ट्रान्सपोर्ट प्लाझा शासनाच्या विविध विभागाकडे असलेल्या २ हजार ८३३ हेक्टर जमिनीच्या देखभालीसाठी ॲसेट मॅनेजमेंट कंपनी, नागरी परिवहन आणि विदर्भातील वाढत्या औद्योगिक विकासाला डोळ्यापुढे ठेवून इंडस्ट्रीअल कॅारिडोअर निर्माण करण्याची तयारी पूर्ण झाल्याचे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सभापती संजय मिणा यांनी सांगितले. नागपूर बाह्यवळण मार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाणार आहे. यासाठी नऊ तालुक्यातील ९९ गावांमधील अंदाजे १ हजार ६९७. १८ हेक्टर आर जमीन यासाठी संपादित केली जाणार आहे. बाह्यवळण रस्तासाठी एकूण १३ हजार ७४८ कोटी खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवीन नागपूरसाठी मौजा गोधणी (रिठी), मौजा लाडगाव (रिठी), हिंगणा या महसुली गावांचे अंदाजे ६९२.६ हेक्टर आर एवढे आहे असल्याचे त्यांनी सांगितले.

# नगर परिषद निवडणुक जाहिर; प्रमुख पक्ष व उमेदवार लागले तयारीला!

**दैनिक युवक आधार**
**(प्रतिनिधी )सेलू शिवाजी पवार**

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २४६ नगरपरिषदांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्यात सेलू नगर परिषदेचाही समावेश आहे.या घोषणेनंतर शहरात निवडणुकीची लगबग वाढली असून प्रमुख राजकीय पक्ष आणि इच्छुक उमेदवारांनी तयारीला सुरुवात केली आहे. निवडणूक आयोगाने

घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार, नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची मुदत १० ते १७ नोव्हेंबर अशी असेल.१८ नोव्हेंबर रोजी अर्जांची छाननी होणार असून,माघार घेण्याची



अंतिम तारीख २१ नोव्हेंबर आहे. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची अंतिम यादी आणि चिन्ह वाटप केले जाईल.त्यानंतर २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबरला मतमोजणी पार पडणार आहे.

या पार्श्वभूमीवर पुढील काही दिवसांत उमेदवार निवडीसाठी पक्षांतर्गत चाचपणी आणि बैठकींना वेग येण्याची शक्यता आहे.सेलू शहरातील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे नवीन आघाड्या निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही स्वतंत्र उमेदवार देखील जोरदार तयारीत असल्याचे संकेत मिळत आहेत.

शहरातील विविध प्रभागांमध्ये इच्छुकांनी जनसंपर्क मोहिमा सुरू केल्या असून मतदारांशी संवाद साधत पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान,पक्षांच्या गटांमध्ये प्रचार नियोजन, रणनीती आखणी आणि अंतर्गत चर्चा जोरात सुरू झाल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सेलू शहराचे राजकीय वातावरण तापले असून नागरिकांचे लक्ष आता पक्षांच्या उमेदवार निवडीकडे लागले आहे.

# नगर परिषद सेलूच्या लोगोमध्ये चिन्हा मध्ये श्री केशवराज बाबासाहेब महाराज यांच्या प्रतिमेचा समावेश करण्याची भारतीय जनता पार्टीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत**

सेलू नगरी ही संत परंपरेने आणि अध्यात्मिक वारशाने नटलेली भूमी आहे. या पवित्र भूमीत कार्यरत असलेले श्री केशवराज बाबासाहेब महाराज, जे शिर्डीच्या साईबाबांचे गुरु म्हणून ओळखले जातात, हे समाजप्रबोधन, सेवा आणि समतेचे प्रतीक आहेत. सेलू शहराची ओळख श्री केशवराज महाराज यांच्या कार्याशिवाय अपूर्ण आहे. त्यांच्या स्मृतीचा गौरव राखण्यासाठी आणि शहराच्या अध्यात्मिक परंपरेचा सन्मान करण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पार्टी, सेलू शहर आणि तालुका




वतीने नगर परिषद सेलूच्या अधिकृत लोगोमध्ये (चिन्हात) श्री केशवराज बाबासाहेब महाराज यांच्या पवित्र प्रतिमेचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

ही मागणी आज नगर परिषद, सेलू येथे पक्षाच्यावतीने लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली. या निवेदनावर अशोक शेलार, शहराध्यक्ष –भारतीय जनता पार्टी, सेलू

व गणेश काटकर, तालुकाध्यक्ष – भारतीय जनता पार्टी, सेलू यांच्या स्वाक्षऱ्या असून, पक्षातील इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये, निरज लोया,कृष्णा गायकवाड, कपिल फुलारी, बाळासाहेब काजळे, महेश आपा नावाडे, दीपक चव्हाण, विष्णू इगोले, नामदेव आवटे, अशोक ताठे, अजय डासाळकर, शुभम खंदारे, खाजा बेग, प्रशांत ठाकूर आणि गणेश सवणे यांचा समावेश होता.या मागणीची नगर परिषद प्रशासनाने सकारात्मक दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी भारतीय जनता पार्टी, सेलू शहर व तालुक्याची अपेक्षा आहे.

# खार बंदिस्ति रस्त्यावरून अवजड वाहतूक बंद करण्याची संजय जांभळे यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके.**

वडखळ हद्दीतील वावे गावात खारबंदीसती रस्त्याजवळ सर्वे नंबर ८३/१ जवळ योजनेच्या बांधावरून अवजड वाहतूक सुरू असून ती बंद करण्याची मागणी संजय जांभळे मा. बांधकाम सभापती यांनी उपविभागीय अभियंता खारभूमी विकास उपविभाग पेण यांच्या जवळ निवेदन देऊन त्यांच्याकडे केली आहे. सदर निवेदनात जमीन सर्वे नंबर ८३/१ वडखळ विभागातील वावे गाव,पेण हद्दीतून जाणाऱ्या बंदिस्तेच्या रस्त्यावरून मीरा नॅचरल रिसोर्सेस या कोळसा कारखान्याकडे होत असलेल्या बेकायदेशीर अवजड वाहन वाहतुकीबाबत संजय जांभळे यांनी खारभूमी वडखळ ग्रामपंचायत यांच्याकडे तक्रार केली आहे की सदर वाहतूक बंद करण्यात यावी. जमीन सर्वे नंबर ८३/१ वडखळ हादीतील वावे गाव तालुका पेण ही खारभूमी योजनेतील जमीन असून तिच्या हद्दीतून जाणाऱ्या बंदिस्तेच्या रस्त्यावरून मीरा नॅचरल रिसोर्सस या कोळसा कारखान्याकडे अवजड वाहने





(डंपर, ट्रक) इत्यादी ने,आण, केली जात आहे सदर कोळसा कारखाना सर्वे नंबर १९०/१/अ गाव वावे तालुका पेन या जमिनीवर चालविला जात आहे. सदर जमिनीचे मालक कृष्णा धर्माजी म्हात्रे, दत्तात्रय धर्माजी म्हात्रे, जयश्री जयराम म्हात्रे, विजया विठोबा पाटील वरील व्यक्ती असून त्यांनी खारभूमी विभागाकडून सात वर्षांपूर्वी अवजड वाहन वाहतुकीस परवानगी घेतली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु खार भूमी विभागातील उपविभागीय अभियंता अतुल भोईर खारभूमी विकास उपविभाग पेन रायगड यांनी लेखी स्वरूपात कळवले आहे की अशी कोणतीही परवानगी खारभूमी विभागाकडून दिलेले नाही. खारभूमी यांनी दिलेल्या पत्रात असे कळवले आहे की बांधावरून अवजड वाहतूक करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या अवजड वाहतुकीस परवानगी देण्यात आलेली नाही सदरबांध हा मातीचा असून धर्मतर मुख्य खाडीच्या उपखाडीला लागून आहे सदर बांधावर कंपनीचे स्लॅग, वेस्ट टाकून रस्ता तयार करण्यात आलेला आहे. परंतु सदर बांध हा अवजड वाहनासाठी योग्य नसून कोणत्याही प्रकारच्या वाहतुकीची परवानगी खारभूमी विभागाकडून देण्यात आलेले नाही. अवजड वाहतुकीमुळे बांध खचल्यास किंवा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास विभाग त्यात जबाबदार राहणार नाही. यावरून स्पष्ट होते की सदर वाहतूक पूर्णतः बेकायदेशीर असून सदर बेकायदेशीर अवजड वाहन वाहतूक तात्काळ थांबवण्यात यावी मीरा नॅचरल रिसोर्सेसु कोळसा कारखाना व संबंधित जमीन मालकावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. परिसरात होत असलेल्या प्रदूषणाची तपासणी पर्यावरण विभागाकडून करून योग्य ती कारवाई करण्यात यावी भविष्यात अशा प्रकारची वाहतूक पुन्हा होऊ नये म्हणून सदर रस्त्यावर प्रतिबंधात्मक फलक लावण्यात यावा. सदरचे निवेदन खारभूमी विकास उपविभाग पेन यांच्याकडे देण्यात आले असून या प्रकरणाची तातडीने तपासणी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी माहिती घेतलेल्या पत्रकार परिषदेत संजय जांभळे बांधकाम सभापती यांनी दिली.

# पनवेल महापालिकेचा आरोग्य विभाग निद्रिस्त - नागरिकांचे आरोग्य धोक्यात!

**उपाध्यक्ष, पनवेल महानगरपालिका कर्मचारी कामगार सेना दिपक कोळवणकर यांचा सवाल : "५८ बेडचे संसर्गजन्य रुग्णालय अजूनही कागदावरच का?"**






**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेचा आरोग्य विभाग पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. "आपले सरकार" पोर्टलवर दाखल झालेल्या तक्रारीला महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने दिलेल्या उत्तरातून आरोग्य सेवांतील निष्क्रियता आणि निधी वापरातील बेपर्वाई उघड झाली आहे.

पनवेल महापालिकेच्या म्हणण्यानुसार, ५८ बेडचे संसर्गजन्य रोग रुग्णालय (Infectious Disease Hospital) सन २०१४ पासून प्रस्तावित असले तरी अद्याप सुरू झालेले नाही. तसेच हाऊसकीपिंग, रासायनिक निर्जंतुकीकरण साहित्य आणि महामारी नियंत्रण उपाययोजनांसाठी (Epidemic Control Measures) मंजूर निधी असूनही २०२४-२५ या आर्थिक वर्षात एक रुपयाचाही प्रत्यक्ष खर्च झालेला नाही, हे स्वतः महानगरपालिकेच्या अधिकृत पत्रातून स्पष्ट झाले आहे.

"पनवेलसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरात आरोग्य सुविधा थांबल्या आहेत, आणि अधिकारी मात्र केवळ कागदपत्रे तयार करण्यात व्यस्त आहेत," अशी तीव्र टीका

पनवेल महानगरपालिका कर्मचारी कामगार सेनेचे उपाध्यक्ष दिपक कोळवणकर यांनी केली. त्यांनी पुढे म्हटले, "संसर्गजन्य आजार वाढत असताना, नागरिकांना बेड, औषधे आणि वैद्यकीय सुविधा न मिळणे ही प्रशासनाची अमानुष आणि निष्काळजी भूमिका आहे. मंजूर निधी वर्षानुवर्षे वापरात येत नाही, आणि अधिकारी केवळ स्पष्टीकरण देत बसले आहेत. या दुर्लक्षाबद्दल संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तत्काळ चौकशी व्हायला हवी."

> "नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न हा कोणत्याही राजकीय सीमांच्या पलीकडे आहे.पनवेल महानगरपालिकेने "रुग्णालय सुरू करणार" अशा आश्वासनांवर वेळ घालवण्याऐवजी प्रत्यक्ष काम सुरू करावे
> - दिपक कोळवणकर